पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई I वर्ष: 6 I अंक: 21 I 1 नोव्हेंबर, 2024 I पृष्ठसंख्या: 36 I किंमत: 5 रू.



# महाविजयासाठी महायुती सज्ज





## अध्यक्षीय मनोगत

# विकासासाठी महाविजयाचा निर्धार

विधानसभा निवडणुकीसाठी दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल व २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागेल. या निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळेल. तिसऱ्यांदा भाजपाच्या नेतृत्वात विजयाचा झेंडा फडकविला जाईल. महायुतीच्या उमेदवारांनी राज्यात सर्वत्र जल्लोषात निवडणूक अर्ज दाखल केले. कार्यकर्त्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. महायुतीच्या नेत्यांनी समन्वयाने वाटचाल चालू ठेवली आहे. या निवडणुकीत आपल्याला विकासाच्या मुद्द्यावर सांगण्यासारखे खूप काही आहे. वेळ पुरणार नाही पण मुद्दे संपणार नाहीत, अशी आपल्या सरकारची यशस्वी कामगिरी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने खूप कमी वेळात चमकदार कामगिरी केली आहे. महिलांना महिना दीड हजार रुपये देण्याच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा सर्वत्र बोलबाला आहे. महिलांना एसटी प्रवासात अर्धे तिकिट लागू केल्यामुळे त्यांना अधिक आनंदाने आणि मोकळेपणाने प्रवास करता येत आहे. मुलींना मेडिकल व इंजिनिअरिंगसह सर्व उच्च शिक्षण मोफत करण्याचा आपल्या सरकारचा निर्णय पुरोगामी पाऊल आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष नोकरीचा अनुभव घेऊन करिअरसाठी तरुण तरुणींना सज्ज करण्यासाठीची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना खूप महत्त्वाची आहे. यामुळे तरुण तरुणींना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो आणि राज्य सरकारकडून विद्यावेतन मिळते. ज्येष्ठ नागरिकांसाठी आपल्या सरकारने अनेक चांगल्या योजना आणल्या आहेत. शेतकऱ्यांना मोफत वीज आणि एक रुपयात पीक विमा हे आतापर्यंत कोणत्याच सरकारला न जमलेले काम आपल्या सरकारने करून दाखविले. मराठा समाजाला आपल्या सरकारने शिक्षण व नोकरीमध्ये दहा टक्के आरक्षण दिले आहे व ते लागू झाले आहे. मराठा आरक्षण देताना आपल्या सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का लागू दिलेला नाही. मराठा समाजासोबतच ओबीसी, एससी व एसटी समाजासाठी आपल्या सरकारने काम केले आहे. एकीकडे सामाजिक न्यायासाठी प्रभावी काम करतानाच आपल्या सरकारने रस्ते, पूल, सिंचन योजना यासाठी परिवर्तनकारी काम केले आहे. लाखो कोटी रुपयांच्या विकास योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. समृद्धी महामार्ग, मेट्रो प्रकल्प, अटल सेतू, मुंबईचा कोस्टल रोड या आपल्या सरकारच्या कर्तृत्वाच्या खुणा आहेत. आपल्या सरकारच्या काळात महाराष्ट्र राज्य परदेशी गुंतवणुकीत पुन्हा पहिल्या क्रमांकावर आले. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. समाजाच्या सर्व घटकांना न्याय देतानात राज्य आर्थिक विकासाच्या बाबतीत अग्रेसर रहावे म्हणून आपल्या सरकारचे काम आहे. दुसरीकडे विरोधकांकडे विकासाचे कोणतेच मुद्दे नाहीत. त्यांची विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्याचीही तयारी नाही. त्यांना फक्त जात, धर्म याच्या आधारे फूट पाडून स्वतःचा स्वार्थ साधायचा आहे. त्यांचा लोकसभा निवडणुकीतील फेक नॅरेटीव्हचा खेळ आता चालणार नाही. जनतेने महायुतीच्या कामाचा अनुभव घेतला आहे. मतदारांनी आता विकासासाठी महायुतीच्या महाविजयाचा निर्धार केला आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग



०४ महाविजयासाठी महायुती सज्ज




०७ महाराष्ट्राच्या विकासाला गती शेतकरी, महिला कल्याणाची निती



१४ स्वच्छमेव जयते...



१६ विकसित भारताच्या दिशेने आगेकूच



१८ भारताची एक इंचही जमीन घेऊ देणार नाही



२० 'मविआ' ला विकासाबद्दल बोलण्याची भीती का वाटते?




संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना
विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# महाविजयासाठी महायुती सज्ज



विधानसभा निवडणुकीसाठीचे रणशिंग फुंकले गेले आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पक्ष, रयत क्रांती यांची महायुती या निवडणुकीत महाविजय मिळवण्यासाठी सज्ज झाली आहे. मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना आणि महायुती सरकारने राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आखलेल्या योजना याच्या जोरावर महायुती पुन्हा सत्तेवर येणार, यात तिळमात्रही शंका नाही.

**लोकसभा** निवडणुकीत २ लाख मते अधिक मिळवल्याने महाविकास आघाडीचे विमान हवेत गेले होते. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मतदारांची दिशाभूल करून महाविकास आघाडीने मिळवलेल्या यशाचे रंग आता उतरू लागले आहेत. खुद्द मतदारांनाही आपली फसगत झाल्याचे ध्यानात येऊ लागले आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात राहिलेल्या त्रुटी दूर करून महायुतीचे नेते संपूर्ण आत्मविश्वासाने विधानसभा निवडणुकीच्या रणांगणात उतरले आहेत. लोकसभा निवडणुकीत केल्या गेलेल्या खोट्या प्रचाराचे नाणे विधानसभा निवडणुकीत चालणार नाही, हे हरयाणाच्या मतदारांनी दाखवून दिले आहे. या निवडणुकीत महायुती फक्त आणि फक्त विकासकामांच्या आधारावर मतदारांपुढे जात आहे. गेल्या अडीच वर्षातील आणि त्याआधी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाच्या ५ वर्षातील कामांचा लेखा-जोखा महायुतीने जनतेपुढे सादर केला आहे. विकासकामांचे प्रगती पुस्तक मतदारांपुढे ठेऊन महायुती विजय मिळवण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्याकाळातील गैरकारभार, अकार्यक्षमता याचा महायुतीने केलेला पंचनामा जनतेपुढे ठेवण्यात आला आहे. स्वत:च्या पक्षाच्या आमदारांनाही न भेटणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना सरकार कसे चालवू नये, याचे प्रात्यक्षिक सादर केले होते.

राज्य सरकारचा कारभार चालवताना राज्यकर्त्याने वर्तमान काळातील स्थितीनुसार निर्णय घेण्याबरोबरच, धोरण ठरवण्याबरोबरच भविष्य काळाकडे नजर ठेऊन निर्णय घेणे अपेक्षित असते. तशी दृष्टी काँग्रेस आघाडीचे सरकार राज्यात सलग १५ वर्षे सत्तेत असताना दाखवली गेली नव्हती. देवेंद्र फडणवीस यांनी पुढच्या ५० वर्षांचा विचार करत मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांसाठी मेट्रो सुरू करण्याचा निर्णय २०१५ मध्ये घेतला. नुसता निर्णय फडणवीस सरकार थांबले नाही, तर या तिन्ही शहरातील मेट्रोसाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतूदी केंद्रातील मोदी सरकारच्या माध्यमातून प्राधान्याने पूर्ण केल्या गेल्या. त्यामुळे पुण्यात स्वारगेट ते पिंपरी, वनाझ ते रामवाडी या दोन मार्गीका पूर्ण झाल्या आहेत. वाहतूक कोंडीला वैतागलेले पुणेकर मेट्रो सेवेचा मोठ्या संख्येने लाभ घेऊ लागले आहेत. मेट्रोचा निर्णय २०-२५ वर्षापूर्वीच घेतला गेला असता तर पुणेकरांची वाहतूक कोंडीतून केव्हाच मुक्तता झाली असती. पुणे महापालिकेत काँग्रेसची सत्ता असताना शहरांतर्गत बस सेवेचा बीआरटी प्रकल्प सुरू करण्यात आला होता. मात्र या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना कसलेच नियोजन न करता आल्याने या प्रकल्पाचा पूर्णपणे बोजवारा उडाला. अहमदाबादमध्ये बीआरटी सेवा अत्यंत कार्यक्षमपणे सुरू आहे. तसे नियोजन करणे तेंव्हाच्या काँग्रेसच्या सत्ताधारी मंडळींना जमले नव्हते. उद्धव ठाकरे यांच्याकडेही विकासासाठीच्या दूरदृष्टीचा अभाव आहे. मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राच्या हितासाठीचा एकही प्रकल्प ज्यांना सुरू करता आला नाही, त्या उद्धव ठाकरेंनी मुंबई मेट्रोला स्थगिती देऊन आपल्या संकुचित वृत्तीचे दर्शन घडवले. उद्धव ठाकरे यांच्यामुळेच मुंबई मेट्रोचे काम २ वर्षे बंद पडले. परिणामी मुंबई मेट्रोसाठीचा खर्च ४ हजार कोटींनी वाढला. मेट्रोला स्थगिती मिळाली नसती तर मुंबई मेट्रो केव्हाच सुरू झाली असती. मुंबई, पुणे आणि नागपूर मेट्रोबरोबर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाची घोषणा केली. हा महामार्ग राज्याच्या विकासाचे चाक आणखी गतीमान करणारा ठरला आहे. मुंबईतील अटल सेतू, कोस्टल रोड यासारखे पायाभूत सुविधांचे प्रकल्प सामान्य नागरिकांचे जीवन सुखकर करणारे ठरले





आहेत. महायुती सरकारने अलिकडेच महिला वर्गासाठी ‘लाडकी बहीण’ योजना सुरू केली. सर्वसामान्य स्थितीतील महिलांना अतिशय उपकारक ठरणाऱ्या या योजनेला महिला वर्गाकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. या योजनेच्या लोकप्रियतेमुळे महविकास आघाडीच्या नेत्यांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळेच या योजनेविषयी सातत्याने अपप्रचार केला जात आहे. महायुती सरकारला विरोध करताना ‘लाडकी बहीण’सारख्या योजना बंद पाडण्याचे गलिच्छ राजकारण महाविकास आघाडीने खेळले. या योजनेच्या विरोधात न्यायालयात जाण्यापर्यंत महाविकास आघाडीने मजल मारली. शेतकरी वर्गासाठी महायुती सरकारने क्रांतीकारक निर्णय घेतले आहे. १ रुपयात पीक विमा, ४२ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज यासारखे निर्णय महायुती सरकारने घेऊन काम करणारे सरकार कसे असते, हे शेतकरी वर्गाला दाखवून दिले आहे. सोयाबीनचे भाव उतरल्यामुळे मोदी सरकारने राज्यातील १३ लाख टन सोयाबीन ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या दराने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी सोयाबीनच्या दरात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. महायुती सरकारने सुमारे ५० लाख शेतकऱ्यांना २ हजार ३९८ कोटी रुपये एवढी भरपाई दिली आहे.

या खणखणीत विकासकामांच्या आधारावर महायुती निवडणुकीला सामोरी जात आहे. २०१९ मध्ये मतदारांनी भाजपा–शिवसेना युतीला निर्विवाद बहुमत दिले होते. मात्र उद्धव ठाकरे यांनी मतदारांचा विश्वासघात करत काँग्रेस आणि शरद पवारांबरोबर मुख्यमंत्रीपदासाठी हातमिळवणी केली. मतदार यावेळच्या निवडणुकीत उद्धव ठाकरेंना त्या विश्वासघाताबद्दल नक्कीच धडा शिकवतील. ■

# महाराष्ट्राच्या विकासाला गती शेतकरी, महिला कल्याणाची निती

## देवेंद्रजींनी दिलेले मराठा आरक्षण उद्धव ठाकरेंनी घालवले



- देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राज्यात पहिल्यांदा मराठा समाजाला आरक्षण
- ते हायकोर्टात टिकवले, सरकारमध्ये असेपर्यंत सुप्रीम कोर्टात टिकविले, उद्धव ठाकरेंनी घालविले
- या आरक्षणानुसार मराठा समाजातील उमेदवारांची सुमारे ४ हजार ५०० अधिसंख्य पदे भरली
- मराठा आंदोलनात मृत्यू झालेल्या ४२ आंदोलनकर्त्यांपैकी पात्र ३५ वारसांना एसटीत नोकरी. या ३५ कुटुंबांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख प्रदान

## मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक निर्णय

- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे पुनरुज्जीवन
- १ लाखांहून अधिक बनले उद्योजक, ८ हजार ३२० कोटींचे कर्ज वितरित
- राजर्षि छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतून आर्थिक मागास १७ लाख ५४ हजार ४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी ९ हजार २६२ कोटी रुपये मंजूर
- सारथी : राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती योजनेतून युपीएससी परीक्षेत ५१ उमेदवार यशस्वी (१२ आयएएस, १८ आयपीएस, ८ आयआरएस, १ आयएफएस, १२ इतर सेवा)
- एमपीएससी परीक्षेत : ४८० उमेदवार यशस्वी, एकूण २ हजार १०९ विद्यार्थ्यांना ९७ कोटी रुपये
- सारथीमार्फत ८० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
- सारथी विभागीय कार्यालयांसाठी (छत्रपती शिवाजी महाराज संकुल) ८ विभागात शासनाकडून विनामूल्य जमिनी
- सारथी पुणे कार्यालय : ४२.७० कोटी
- सारथी खारघर : ११९.३८ कोटी रुपये
- सारथी उपकेंद्र, कोल्हापूर : १७६.३८ कोटी रुपये
- सारथी नाशिक : १५८.९९ कोटी रुपये
- छत्रपती संभाजीनगर : १४०.२४ कोटी रुपये
- लातूर : १७२.८६ कोटी रुपये
- नागपूर : २०४.६४ कोटी रुपये
- असा एकूण १ हजार २४ कोटींचा निधी मंजूर (या प्रत्येक ठिकाणी ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका तसेच ५०० मुले आणि ५०० मुलींचे वसतीगृह उभारणार)
- कौशल्य प्रशिक्षण : सारथीतर्फे ३५ हजार ७२६ विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण
- कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम : छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास : २७ हजार ३४६ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु
- ९वी ते ११वी साठी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना : गेल्यावर्षी ३२ हजार ५३९ विद्यार्थ्यांना ३१.२३ कोटी रुपये, यावर्षी ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना ४२ कोटी रुपये शिष्यवृत्ती वितरीत
- महाराजा सयाजीराव गायकवाड परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना : ४ जुलै २०२३ रोजी मंत्रिमंडळाची

मान्यता/दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना (एमएससाठी ६० लाख तर पीएच.डी.साठी १.६० कोटी) एवढी शिष्यवृत्ती देणार

- डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह योजना : ३ लाख ७९ हजार ३७३ विद्यार्थ्यांना १ हजार २९३ कोटी रुपये वितरित
- छत्रपती शिवाजी महाराज स्मृती ग्रंथाच्या ५० हजार प्रती प्रकाशित
- स्वाधार योजनेच्या निर्वाह भत्त्यात वाढ : महानगरात ६० हजार तर विभागीय मुख्यालय ठिकाणी ५१ हजार रुपये एवढा भत्ता मिळणार
- जिल्ह्याला ४३ हजार, तालुक्याला ३८ हजार रुपये थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणार

## महिलांना आधार



- लाडकी बहिण योजना: १५०० प्रतिमहा/१८,००० प्रतिवर्ष (१.६० कोटी महिलांना लाभ दिले/ ५० लाख अजून वाढणार)
- अन्नपूर्णा योजनेत वर्षातून ३ सिलेंडर
- लखपती करणारी लेक लाडकी योजना
- महिलांना एसटी प्रवास अर्ध्या तिकिटात
- सर्व सरकारी कागदपत्रांवर आईचे नाव
- लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजना: १०,००० विद्यावेतन/१ लाखांवर नियुक्तीपत्रे

## १ रुपयांत पीक विमा



- शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी: ६०००+६०००
- १ रुपयांत पीकविमा
- शेतकऱ्यांना मोफत वीज/सौर कृषीपंपातून दिवसा वीज
- सोयाबीन, कापूस, धान, दूधाला मदत
- दुष्काळ, सततचा पाऊस, अतिवृष्टीसाठी कोट्यवधीची मदत, मदतीच्या निकषात वाढ
- सिंचनाच्या सव्वाशेहून अधिक प्रकल्पांना निधी आणि मंजुरी
- महात्मा जोतिबा फुले जनारोग्य योजनेत ५ लाखांपर्यंत उपचार
- निराधार योजना, पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी, आशा सेविका अशा सर्व घटकांसाठी मानधन वाढ
- पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्तीत ५ पट वाढ

## विश्वकर्मा योजनेसाठी १३ हजार कोटींचा निधी

- ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा
- वैद्यकीय प्रवेशात राष्ट्रीय कोट्यात ओबीसींना २७ टक्के आरक्षण
- गावगाड्यातील कारागिरांना व्यावसायासाठी विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून अर्थसहाय्य देणार, केंद्राची १३ हजार कोटींची तरतूद

## महाराष्ट्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालय

- देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना ओबीसींच्या विकासासाठी २६ जीआर काढण्यात आले
- राज्यात स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना
- या मंत्रालयातून ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिक्षण, रोजगार, छात्रावास, आयएएस/आयपीएस प्रशिक्षण, विदेश शिष्यवृत्ती याचे निर्णय
- ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत केले
- ओबीसींसाठी १० लाख घरांची मोदी आवास योजना
- ओबीसींसाठी ४ हजार कोटींची तरतूद (२०२३-२४)

- लिंगायत समाजासाठी, जगदज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, गुरव समाजासाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ स्थापन
- भटक्या विमुक्त जाती-जमातीसाठी पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ स्थापन
- भटक्या विमुक्त जाती-जमातीसाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ (रामोशी) स्थापन
- ओबीसी विद्यार्थ्यांसाठी १० वी पूर्व व १०वी नंतरच्या शिक्षणसाठी शिष्यवृत्तीकरिता १ हजार २०० कोटी
- ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ७५ वसतीगृहे
- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना
- झाडे कुणबी समाजासाठी वसतीगृह

## डॉ.आंबेडकरांचे स्मारक



- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इंदूमिल स्मारकाची आघाडी सरकारच्या काळात फक्त चर्चा झाली. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना या स्मारकाच्या कामाला गती मिळाली. श्री.फडणवीस यांनी पुढाकार घेत ३ दिवसांत मोदीजींकडून ३ हजार ६०० कोटींची जमीन स्मारकासाठी मिळवली. या स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडनमधील घराचे स्मारकात रुपांतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना निधी देऊन महाराष्ट्र सरकारने ते घर खरेदी करीत त्याचे स्मारकात रुपांतर केले मोदीजींच्या हस्ते या स्मारकाचे लोकार्पण झाले
- जपानमधील कोयासन विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविला
- दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीला अ वर्ग तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ दर्जा. दीक्षाभूमीला २०० कोटींचा निधी, चैत्यभूमीलाही विकासासाठी निधी
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटरची स्थापना त्यासाठी ५२ कोटींची तरतूद
- सामाजिक न्याय महामंडळे, बार्टीकडून १ लाख युवक-युवतींना रोजगारासाठी प्रशिक्षण

## विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

- विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना: वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवासाचा खर्च थेट खात्यात
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ६५ नवीन वसतीगृहांची निर्मिती. २५ हजार विद्यार्थ्यांची क्षमता ४४ हजारांवर नेली
- संत रोहिदास भवन, ड्रॅगन पॅलेस, दीक्षाभूमी, चिंचोली स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर आदींना २१५ कोटींचा निधी
- काँग्रेस सत्तेत असताना अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देताना ३१ कोटी ५ वर्षांत द्यायची, ती ५ वर्षांत १०७ कोटी इतकी दिली
- बार्टीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांसाठी मदत/ कौशल्य प्रशिक्षण इत्यादी
- एवढेच नाही तर उद्योजक तयार व्हावे म्हणून २३ 'एमआयडीसी'त १०६ प्लॉट अनुसूचित जातींसाठी दिले
- जात पडताळणी समिती सर्व जिल्ह्यात
- रशियात अण्णाभाऊंच्या स्मारकाचे लोकार्पण
- मुंबईच्या चिरागनगरमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक
- आद्य क्रांतीगुरु लहुजी साळवे यांचे स्मारक, संगमवाडी: १२५ कोटींची तरतूद
- अण्णाभाऊ साठेंच्या नावे अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, आर्टीचे निर्माण, यात मातंग, मांग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारूडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारूडी, मादगी, मादिगा इत्यादी जाती समाविष्ट

- मातंग समाजाच्या विद्यार्थ्यांना देशात ३० लाख आणि परदेशात शिक्षणासाठी ४० लाख कर्जाच्या योजना/ शिष्यवृत्तीच्या रकमेत मोठी वाढ
- बार्टी आणि आर्टी : दोघांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद
- आता बार्टीकडून फ्रेंच, रशियन, जपानी, जर्मन, स्पॅनिश भाषांचे शिक्षण
- बार्टीच्या ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याचा निर्णय

## आदिवासी विकासासाठी ११ हजार १९९ कोटींची तरतूद

- बिरसा मुंडा जयंती: आदिवासी गौरव दिवस म्हणून साजरा
- पंतप्रधान आदिवासी आदर्श ग्रामविकास योजना
- देशाला पहिल्या महिला आदिवासी राष्ट्रपती
- आदिवासी विकासाससाठी सर्वांगिण कृती आराखडा
- मंत्रालयात वेगळा कक्ष स्थापन करणार
- आदिवासी विकासासाठी ११ हजार १९९ कोटींची तरतूद
- आदिवासी आश्रमशाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम
- स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण
- आदिवासी कला, संस्कृती, वेशभूषा, परंपरा जतन करण्यासाठी नागपूर/नाशिक येथे संग्रहालय
- शबरी, पारधी, आदिम आवास योजनेसाठी १ हजार २०० कोटी/१ लाख घरे
- बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, बंजारा आणि धनगर वाड्या, वस्ती असे मिळून ४ हजार कोटी रुपये
- अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गातील पदे थेट स्थानिक आदिवासींमधून भरणार (लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक)
- पेसा रहिवासी दाखला एकात्मिक आदिवासी प्रकल्पातून वेळेत
- आदिवासी योजनांच्या माहितींसाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक
- या टोल फ्री नंबरवरून सर्व माहिती, रेशनकार्ड, आधार, पॅन, जमाती दाखले, बँक खाते, मनरेगा नोंदणी, आयुष्मान भारत कार्ड आदी सर्व सुविधा
- आदिवासी आश्रमशाळा, वसतीगृह आणि शिक्षक/ कर्मचारी यांना शासकीय इमारती
- सर्व आश्रमशाळा, वसतीगृहांचे डिजिटायझेशन
- पहिली, दुसरीत मराठी, हिंदी, इंग्रजीसोबतच स्थानिक आदिवासी बोली भाषेतून शिक्षण
- ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा
- दरवर्षी १०० आदिवासींना पीएचडीसाठी शिष्यवृत्ती
- २५० आदिवासी आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा करणार

## विदर्भातील जलसिंचन प्रकल्पांना गती



- वैनगंगा–नळगंगा–पैनगंगा नदीजोड प्रकल्प: ८७ हजार ३४२ कोटी (नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशीम जिल्ह्यांना लाभ/३.७१ लाख हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा)
- बळीराजा जलसंजीवनी: ६९ प्रकल्प/१५ हजार ८०० कोटी
- प्रधानमंत्री कृषी सिंचन: ७ प्रकल्प
- बावनथडी, खडकपूर्णा, डोंगरगाव पूर्ण
- निम्नवर्धा, बेंबळा, निम्नपेढी लवकरच पूर्ण
- जिगाव प्रकल्पाला ६०६१ कोटी.
- बोरव्हा बॅरेज, मंगरूळपीर : १६२ कोटी
- घोटाशिवणी बॅरेज, मंगरूळपीर : २३४ कोटी
- गोसिखुर्दसाठी १५०० कोटी/अंभोऱ्यात जलपर्यटन केंद्र: ३२९ कोटी

## धानाला बोनस, सोयाबीन–कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत

- धानाचा बोनस : २० हजार रुपये
- सोयाबीन आणि कापसाला हेक्टरी ५००० रुपये, अशी २ हेक्टरपर्यंत मदत

- विदर्भ आणि मराठवाड्यातील दुग्धप्रकल्पासाठी १६० कोटी
- विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना धान्याऐवजी रोख रक्कम
- नागपुरात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र (२२८ कोटी)
- नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, बुलढाणा अशा ५ ठिकाणी आधुनिक संत्राप्रक्रिया केंद्रे
- अकोल्यात पशुवैद्यकीय महाविद्यालय
- आयआयएम, ट्रीपल आयटी, राष्ट्रीय विधी विद्यापीठ अशा सर्व संस्था विदर्भात
- श्री क्षेत्र रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ
- एम्स, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटसारख्या वैद्यकीय सुविधा भक्कम, नागपुरातील मेयो, मेडिकलचा विस्तार
- विदर्भातील अमरावती, भंडारा, गडचिरोली, वर्धा, बुलढाणा अशा ५ ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
- जुलै २०२२ पासून विदर्भात एकूण ४३ उद्योग ८८ हजार ८०९ कोटींची गुंतवणूक/५४ हजार रोजगार
- अमरावती येथे पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क (२ लाख रोजगार/१० हजार कोटींची गुंतवणूक)
- गडचिरोलीत स्टील उत्पादन क्षेत्रात २५ हजार कोटींची गुंतवणूक करार/व्यापक रोजगार संधी
- नागपुरात मल्टिमॉडल लॉजिस्टिक पार्क (१ हजार एकर)
- वर्धा ड्रायपोर्ट
- चंद्रपूर येथे कोल गॅसिफिकेशन प्रकल्प
- गडचिरोलीत आता विमानतळाची उभारणी
- समृद्धी महामार्ग सुद्धा गडचिरोलीपर्यंत नेणार
- नागपूर मेट्रो: ४० कि.मी./आता दुसरा टप्पा ६ हजार ७०० कोटींचा
- प्रधानमंत्री आवास योजनेत ९.४८ लाख घरे विदर्भात मंजूर

## मराठवाड्यात ५४ टीएमसी पाणी आणणार

- मराठवाडा वॉटर ग्रीडद्वारे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवणार
- पश्चिम वाहिनी वैतरणा व उल्हास उपखोऱ्यातील अतिरिक्त ५४.७० टीएमसी पाणी मराठवाड्यात आणणार
- गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ : २ वर्षात ७ प्रकल्पांची घळभरणी पूर्ण. एकूण ३८.४८ दलघमी पाणीसाठा निर्माण
- मराठवाड्यातील ११ सिंचन प्रकल्पांना मंजुरी/ १३ हजार ६७७ कोटी रुपये
- कृष्णा-मराठवाडा उपसा सिंचन योजना : ११ हजार ७२६ कोटी रुपये
- जायकवाडी टप्पा-२, माजलगाव, बीड: ५३६ कोटी
- निम्न दुधना प्रकल्प, परभणी: ३ हजार ७० कोटी
- गंगापूर उपसा सिंचन योजना, ब्रम्हगव्हाण : ६९३ कोटी
- बाभळी मध्यम प्रकल्प, धर्माबाद, नांदेड: ७७१ कोटी
- जोडपरळी उच्च पातळी बंधारा, वसमत, हिंगोली: २३६ कोटी
- पिंपळगाव कुटे उच्चपातळी बंधारा, वसतम, हिंगोली: २६६ कोटी
- ममदापूर उच्चपातळी बंधारा, पूर्णा, परभणी : २७१ कोटी
- उनकेश्वर उच्च पातळी बंधारा, किनवट, नांदेड : १९५ कोटी
- उर्ध्व पैनगंगा प्रकल्प : ४ हजार १०४ कोटी

## नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे स्वप्न साकार होणार



- मराठवाड्यात जुलै २०२२ पासून ३४ गुंतवणूक प्रकल्प ७२,८३९ कोटींची गुंतवणूक/ ४० हजार प्रत्यक्ष रोजगार
- पैठण मेगा फूड पार्क, ग्रीनफिल्ड पार्क प्रस्तावित
- ऑरिक सिटीमध्ये टोयोटा किर्लोस्कर प्रकल्प इलेक्ट्रिक आणि हायब्रीड वाहनांचे उत्पादन (प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष १६ हजार रोजगार)
- जालना येथे मल्टीमोडल लॉजिस्टिक पार्क
- लातूर रेल्वे कोच फॅक्टरी
- अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वे प्रकल्पाला गती
- जालना-जळगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग: ३ हजार ५५२ कोटी रुपये
- जालना-राजूर-सिल्लोड-अजिंठा-जळगाव मार्ग (जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र अजिंठा लेणी व राजूर गणपती तीर्थक्षेत्र जोडले जाणार. १७४ किमी)
- अमृत स्थानक योजनेंतर्गत मराठवड्यातील १४ रेल्वे स्थानकांचा विकास
- मनमाड ते छत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्ग दुहेरीकरण: ९६० कोटी
- नांदेड-बिदर, फलटण-पंढरपूर, खामगाव-जालना रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्राचे ५० टक्के सहाय्य
- सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्ग : ४५२ कोटी
- पुणे ते हरंगुळ, लातूर ते तिरुपती रेल्वे सेवा सुरू
- लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांसाठी २ हजार ८०० कोटींचा निधी
- शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला मंजुरी : १४ हजार ८८६ कोटी
- जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग
- इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे उपकेंद्र
- राज्यातील १४ पैकी ३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मराठवाड्यात. जालना, धाराशिव, परभणी
- जालना येथे आयटीआय इन्क्युबेशन सेंटर
- छ. संभाजीनगरमधील वाळूज येथे नवीन क्रीडा विद्यापीठ
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मुलांचे व मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी निधी
- नांदेड येथे ६० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय कृषी महाविद्यालय

## नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला मान्यता



- नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला मान्यता : नाशिक, जळगाव जिल्ह्याला सिंचनाचा मोठा फायदा : ७ हजार १५ कोटी (पश्चिमी वाहिनी नदीखोऱ्यातून १०.६४ टीएमसी पाणीवापर प्रस्तावित, यात ९ धरणे बांधणार) (मांजरपाडाचा सुद्धा प्रस्ताव)
- ऊर्ध्व प्रवरा धरण (निळवंडे): ५ हजार १७७ कोटींचा निधी मंजूर
- नाशिक जिल्ह्यातील उर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी १ हजार ४९८ कोटीचा निधी मंजूर
- प्रकाश बुराई उपसा सिंचन योजनेसाठी ७९४ कोटी निधी
- धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील २२ उपसा सिंचन योजनांना:११५ कोटी (दोन्ही जिल्ह्यातील ५९ गावांना लाभ)
- सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन
- पाडळसे निम्न तापी प्रकल्प : ४ हजार ८९० कोटींचा निधी मंजूर
- जळगाव जिल्ह्यातील वाघूर प्रकल्पासाठी २ हजार २८८ कोटींचा निधी मंजूर
- जळगांव जिल्ह्यातील कुर्हा-वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजनेसाठी २ हजार २२६ कोटींचा निधी

## नाशिकमध्ये रेल्वेच्या चाकांचा कारखाना

- उत्तर महाराष्ट्रात आतापर्यंत १८ उद्योग प्रकल्प, ४ हजार ६२८ कोटी रुपये गुंतवणूक/ ७ हजार ८४२ रोजगार निर्मिती
- नाशिक एमआयडीसीमध्ये फार्मास्युटिकल्स आणि क्रायोजनिक टँक विकसित करण्यासाठी २ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक
- नाशिकजवळ एकलहरे येथे रेल्वेच्या चाकांची निर्मिती करणारा कारखाना उभारून पूर्ण

## धुळे-इंदूर रेल्वेला गती पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे सुरू होणार

- नाशिकमध्ये ९ हजार कोटीहून अधिक खर्चाचे विकास प्रकल्प
- निओ मेट्रो प्रकल्प : २ हजार १०० कोटी
- मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब : १ हजार ५०० कोटी
- आऊटर रिंगरोड : २ हजार ५०० कोटी
- नमामि गोदा प्रकल्प : २ हजार ७०० कोटी
- पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यांना जोडणारा प्रकल्प : पुणे-संगमनेर-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प
- धुळे-इंदूर रेल्वेमार्ग लवकरच पूर्ण
- भुसावळ-जळगाव-मनमाड या चौपदरी रेल्वे ट्रॅकचा विस्तार
- जळगाव ते धुळे या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु
- जालना-जळगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वेसाठी ३ हजार ५५२ कोटी

## टेंभू प्रकल्पासाठी ७ हजार ३७० कोटी

- कृष्णा कोयना सिंचन प्रकल्प : ८ हजार २७२ कोटींची सुप्रमा
- टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्प ७ हजार ३७० कोटींची सुप्रमा (सातारा, सांगली, सोलापूरमधील १० तालुके)
- म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजना: १ हजार ९३० कोटी
- नीरा देवघर प्रकल्प : ३ हजार ९७६ कोटींची सुप्रमा (खंडाळा, फलटण, भोर, माळशिरस तालुक्यांना सिंचन)
- जिहे कठापूर योजना : १ हजार ८५ कोटी (माण खटाव या दुष्काळी तालुक्यातील सिंचन)
- धोम बलकवडी बोगदा प्रकल्प: १ हजार ४०२ कोटी (फलटण, खंडाळा तालुक्यांना सिंचन)
- पुरंदर उपसा सिंचन योजना, जानाई शिरसाई उपसा सिंचन योजना सौरउर्जेवर चालवण्याचा निर्णय. यासाठी ४ हजार २०० कोटी

## अटलसेतू, कोस्टल रोडमुळे प्रवास झाला वेगवान

- अटलसेतू : १७,८४० कोटी
- कोस्टल रोड : १३ हजार ९८३ कोटी
- बांद्रा-वर्सोवा सी-लिंक : ११ हजार ३३२ कोटी
- वर्सोवा-विरार सी-लिंक : ५५ हजार ४७८ कोटी
- विरार-अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉर : ६० हजार २६८ कोटी

## संत तुकाराम-संत ज्ञानेश्वर पालखी मार्गासाठी १२ हजार कोटींचा निधी



- कोल्हापूर-सांगली पूर नियंत्रण प्रकल्प : २ हजार २४० कोटी
- पुणे-अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यांना जोडणारा प्रकल्प म्हणून पुणे-संगमनेर-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प

# स्वच्छमेव जयते...



> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये लाल किल्ल्यावरून केलेल्या पहिल्या भाषणात स्वच्छता अभियानाची घोषणा केली. २ ऑक्टोबर २०१४ पासून या अभियानाला प्रारंभ झाला. या अभियानाची दशकपूर्ती नुकतीच झाली. स्वच्छता या अत्यंत दुर्लक्षित विषयाकडे भारतीयांना गंभीरपणे पाहण्याची सवय या अभियानामुळे लागली आहे. स्वच्छते विषयीची जागरूकता हळूहळू वाढते आहे.

**गेल्या** दशकभरातील भारताच्या वाटचालीत अनेक टप्पे पाहायला मिळाले आहेत, कारण राष्ट्राने स्वतःची नव्याने ओळख निर्माण केली आहे. या टप्प्यात एक महत्त्वाचा अध्याय आहे – स्वच्छतेचा, स्वच्छ भारत अभियानाचा. बापूंचा जयंतीदिन २ ऑक्टोबर, गांधीजी आणि देशातील अन्य महान व्यक्तींनी भारत घडवण्यासाठी पाहिलेल्या स्वप्नाची हा दिवस प्रेरणा देतो. गेल्या १० वर्षांत कोट्यवधी भारतीयांनी स्वच्छ भारत अभियानाचा अंगीकार केला आहे. त्यामुळेच या अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी असे म्हणाले की, माझ्या १० वर्षांच्या प्रवासातील या महत्वपूर्ण टप्प्यावर मी प्रत्येक देशवासी, आपले सफाई मित्र, आपले धर्मगुरू, आपले खेळाडू, आपले सेलिब्रेटी, स्वयंसेवी संस्था, माध्यमातील स्नेही या सर्वांना शाबासकी देतो, त्यांचे मनापासून कौतुक करतो. तुम्ही सर्वांनी मिळून स्वच्छ भारत अभियान ही इतकी मोठी लोकचळवळ बनवली आहे.

हा दशकपूर्तीचा प्रवास उत्सवी स्वरूपात साजरा करण्यासाठी सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला आणि अवघ्या १५ दिवसांत देशभरात २७ लाखांहून अधिक कार्यक्रम झाले, ज्यामध्ये २८ कोटींहून अधिक लोकांनी सहभाग घेतला. या महत्त्वाच्या टप्प्यावर स्वच्छतेशी संबंधित सुमारे १० हजार कोटी रुपयांचे प्रकल्पही सुरू करण्यात आले आहेत. नमामि गंगेशी

संबंधित काम असो किंवा कचऱ्यापासून बायोगॅस तयार करणाऱ्या गोवर्धन प्रकल्पाचे काम असो; हे काम स्वच्छ भारत अभियानाला एका नव्या उंचीवर घेऊन जाईल आणि स्वच्छ भारत अभियान जितके यशस्वी होईल तितका देश उजळेल. आजपासून हजार वर्षांनंतरही जेव्हा २१व्या शतकातील भारताविषयी अध्ययन केले जाईल तेव्हा स्वच्छ भारत अभियानाचे स्मरण नक्कीच होईल. स्वच्छ भारत ही या शतकातील जगातील सर्वात मोठी आणि सर्वात यशस्वी लोकसहभाग असलेली, लोकांच्या नेतृत्वाखालील, लोकचळवळ आहे. या चळवळीत कोट्यवधी लोक सामील झाल्यावर जेव्हा पंतप्रधान मोदींनी एकदा वापर करता येणारे प्लास्टिक न वापरण्याचे आवाहन केले तेव्हा कोट्यवधी लोकांनी खरेदीसाठी बाजारात जाताना तागाच्या पिशव्या आणि कापडी पिशव्या नेण्याची परंपरा सुरू केली. चित्रपट उद्योगही या चळवळीत मागे राहिला नाही... व्यावसायिक लाभापेक्षा चित्रपटसृष्टीने स्वच्छतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी चित्रपट बनवले. पंतप्रधान मोदी म्हणतात, या १० वर्षांत आणि मला असे वाटते की हा विषय केवळ एकदाच आचरणात आणण्यापुरता सीमित नाही, तो पिढ्यानपिढ्या, प्रत्येक क्षणी, प्रत्येक दिवशी करण्याची बाब आहे आणि जेव्हा मी हे म्हणतो तेव्हा मी त्याचा अंगीकार करतो. आता जर 'मन की बात'बद्दल बोलायचे म्हटले तर तुमच्यापैकी अनेकांना 'मन की बात'बाबत माहिती आहे, देशवासीय परिचित आहेत. 'मन की बात'मध्ये मी जवळपास ८०० वेळा स्वच्छतेचा विषय मांडला आहे. लोकांनी लाखोंच्या संख्येने पत्रे पाठवली, लोक स्वच्छतेचे प्रयत्न पुढे आणत राहिले. देशवासीयांचे आणि सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य करणे हे त्यांचे पहिले काम आहे. त्यामुळे ही आपली जबाबदारी मानून त्यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून स्वच्छतागृहे आणि सॅनिटरी पॅड्सबाबत विचार मांडले. त्याचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे.

आज देशात १२ कोटींहून अधिक शौचालये बांधली गेली आहेत. शौचालय सुविधा व्याप्ती ४० टक्क्यावरून १०० टक्के झाली आहे. स्वच्छ भारत अभियानाचा देशातील सर्वसामान्यांच्या जीवनावर झालेला परिणाम अनमोल आहे. एका प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये एक अहवाल समोर आला आहे. हा अहवाल अमेरिकेतील इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट वॉशिंग्टन, कॅलिफोर्निया विद्यापीठ आणि ओहायो स्टेट युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी संयुक्तपणे केला आहे.

स्वच्छ भारत अभियानामुळे दरवर्षी ६० ते ७० हजार मुलांना जीवनदान मिळत असल्याचे समोर आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (डब्ल्यूएचओ) २०१४ ते २०१९ दरम्यान, अतिसारात ३ लाख लोकांचे प्राण वाचले होते. युनिसेफचा अहवाल आहे की घरात शौचालये बांधल्यामुळे ९० टक्क्यांहून अधिक महिलांना आता सुरक्षित वाटत आहे. स्वच्छ भारत मिशनमुळे महिलांमध्ये संसर्गामुळे होणारे आजारही लक्षणीयरीत्या कमी झाले आहेत. लाखो शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधल्यामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. युनिसेफच्या आणखी एका अहवालानुसार स्वच्छतेमुळे गावातील कुटुंबांची दरवर्षी सरासरी ५० हजार रुपयांची बचत होत आहे.

स्वच्छ भारत अभियानाला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील शाळकरी मुलांसोबत स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला आणि त्यांच्याशी संवाद साधला. मनोवैज्ञानिक परिवर्तनातून समृद्धीचा नवा मार्ग स्वच्छतेची प्रतिष्ठा वाढल्याने देशात मनोवैज्ञानिक परिवर्तनही झाले आहे. यापूर्वी स्वच्छता कामात सहभागी असलेल्या लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा होता? अस्वच्छता करण्याला आपला हक्क मानणारा आणि कोणी दुसऱ्याने ते स्वच्छ करणे ही त्याची जबाबदारी मानून स्वतः मोठ्या अहंकाराने जगणाऱ्या लोकांचा एक फार मोठा समूह होता जो मोठ्या अहंकारात जगताना सफाई कर्मचाऱ्यांचा आदर करत नव्हता.

पण जेव्हा सर्वांनी साफसफाई करायला सुरुवात केली तेव्हा त्यालाही वाटू लागलं की मी जे काही करतो तेही खूप छान काम आहे आणि आता तेही माझ्यासोबत आहेत. मानसिक बदल घडवून सामान्य कुटुंबे आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांना अभिमानास्पद वागणूक दिली. आता सरकार खाजगी क्षेत्र आणि जनता एकत्र काम करत आहे, अनेक नवीन स्टार्टअप्स येत आहेत.

आज स्वच्छ तंत्रज्ञानाशी (क्लीन टेक) संबंधित सुमारे ५ हजार स्टार्टअप नोंदणीकृत आहेत. कचरा ते संपत्ती, कचरा संकलन आणि वाहतूक, पाण्याचा पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण अशा अनेक संधी पाणी आणि स्वच्छता क्षेत्रात निर्माण होत आहेत. ■



# विकसित भारताच्या दिशेने आगेकूच

रिफॉर्म-परफॉर्म-ट्रान्सफॉर्मचा मंत्र असो किंवा स्पीड-स्केलची बाब असो, गेल्या १० वर्षांत ते विकासाचा वेग आणि निर्णायक नेतृत्वाचा पर्याय ठरले आहेत. सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन केल्यावर या दृष्टिकोनाला गती देण्यात तसेच लोकहित, राष्ट्रहिताचे धोरण आखून निर्णय घेण्यात व्यस्त असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्या १०० दिवसांत १५ लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास प्रकल्पांना मंजुरी देऊन प्रगतीचा नवा अध्याय लिहिला आहे, विकसित भारताचा मार्ग प्रशस्त करणारे हे १०० दिवस ठरले आहेत. खऱ्या अर्थाने २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याची मिळालेली संधी आणि पहिल्या १०० दिवसांत साकारलेली विकासगाथा ही आकांक्षांच्या भरारीचे आणि प्रगतीच्या दशकाचे द्योतक ठरले आहे...

**भारतात** हिंदीमध्ये एक वाकप्रचार–म्हण प्रचलित आहे– 'नौ दिन चले, अढाई कोस'. याचा अर्थ असा आहे की, कोणत्याही कामाला जास्त वेळ लागणे. स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये विकासाच्या गतीचे अगदी चपखल वर्णन करणारा हा वाकप्रचार, गेल्या १० वर्षांमध्ये केंद्रातील शीर्ष नेतृत्वाने आपल्या वेगवान कार्यपद्धतीने केवळ बदलून टाकला आहे, असे नाही तर; एक नवीन अशी पटकथा लिहिली की, लोक म्हणायला लागले, 'अढाई दिन चले सौ कोस'. विद्यमान केंद्र सरकारने गेल्या १० वर्षांमध्ये परिवर्तनात्मक सुधारणांचा नवीन अध्याय लिहिला आहे. आणि आता तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या १०० दिवसांमध्येच विकसित भारतासाठी नवीन मार्ग प्रशस्त केला आहे. केंद्र सरकारने या १०० दिवसांमध्ये घेतलेल्या निर्णयांमध्ये देशाच्या प्रत्येक नागरिकाचे, प्रत्येक कुटंबाचे, प्रत्येक वर्गाचे कल्याण साधण्याची हमी पक्की झाली आहे. या १०० दिवसांमध्ये १५ लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्चाच्या योजनांवर कामांना प्रारंभ झाला आहे. १०० दिवसांमध्ये घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांनी असे सिद्ध केले आहे की, देशातील गरीब, दलित, पीडित, शोषित–वचितांनी जो विश्वास दाखवला आहे, तो विद्यमान सरकारने १०० टक्के सत्य असल्याचे सिद्ध केले आहे. तिसऱ्या कार्यकाळामध्ये प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची हमी दिली आहे. तर आता देशाची जनता भारताला जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनविण्याच्या संकल्पावर काम करीत आहे. या संकल्पाची झलक, विद्यमान सरकारने तिसऱ्या कार्यकाळाच्या प्रारंभीच्या १०० दिवसांमध्ये घेतलेल्या निर्णयांमध्ये दिसून येते.


### वेग–प्रमाणाचे प्रतिबिंब

या १०० दिवसातील निर्णयांमध्येही केंद्र सरकारची ओळख बनलेल्या 'वेग आणि कामाचे प्रमाण यांचे प्रतिबिंब दिसून येते. भारताचा विकास वेगवान होण्यास मदत मिळण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या प्रत्येक क्षेत्रामध्ये विशिष्ट घटकावर या काळामध्ये विशेष लक्ष दिले गेले आहे. त्यामुळे या १०० दिवसांमध्ये भौतिक आणि सामाजिक पायाभूत विकासाच्या विस्तारासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. भारतामध्ये ७० दशलक्ष म्हणजेच ७ कोटी घरांची उभारणी केली जात आहे, हे पाहून आज संपूर्ण जग आश्चर्यचकीत होत आहे. यामध्ये ४० दशलक्ष म्हणजे ४ कोटी घरांचे बांधकाम केंद्र सरकारने याआधीच्या दोन्ही कार्यकाळामध्ये पूर्ण केले आहे आणि तिसऱ्या कार्यकाळामध्ये नवीन ३ कोटी घरकुले बांधून पूर्ण करण्याचे काम सुरू झाले आहे. गेल्या १०० दिवसांमध्ये भारतात १२ नवीन औद्योगिक वसाहती बनविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या १०० दिवसांमध्ये ८ 'हायस्पीड रोड कॉरिडॉर' प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. या १०० दिवसांमध्ये १५ पेक्षा जास्त नवीन 'मेड इन इंडिया', सेमी हाय स्पीड वंदे भारत रेल गाड्या सुरू केल्या आहेत. संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी १ ट्रिलियन रूपयांचा निधी तयार केला आहे. ई–मोबिलिटीला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक नवीन उपक्रमांना प्रारंभ केला आहे.

वीज, पाणी आणि रस्ते.... या गोष्टी आधी गरीबांसाठी फक्त पायाभूत गरजा मानल्या जात होत्या. परंतु आता मोदी सरकारने यामध्ये शिक्षण आणि आरोग्य यांनाही जोडले आहे. या पाच तत्वांवर भर देवून आम्ही फक्त रोजगाराच्या संधी निर्माण करीत आहोत असे नाही, तर गरीबांचे भविष्यही सुरक्षित करीत आहोत. लक्ष्य उच्च कामगिरी करणाऱ्या 'बायो–मॅन्युफॅक्चरिंग' अर्थात जैव–उत्पादनाला प्रोत्साहन दिले जात आहे. कारण भविष्यात याच गोष्टी महत्वपूर्ण ठरणार आहेत. म्हणूनच बायो ई–श्री धोरणाला मंजुरी दिली आहे. या काळामध्ये हरित ऊर्जेसाठीही मोठे, महत्वपूर्ण निणय घेण्यात आले आहेत. आगामी काळामध्ये ३१ हजार मेगावॅट हायड्रो ऊर्जा निर्मितीसाठी काम केले जाणार आहे आणि त्यासाठी १२ हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक निधी मंजूर केला आहे. या काळामध्ये गरीब आणि मध्यम वर्गाच्या आरोग्याशी संबंधित खूप मोठा, महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. देशामध्ये ७० वर्षांपेक्षा वयाने जास्त असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी ५ लाख रूपयांपर्यंतच्या मोफत औषधोपचार करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या १०० दिवसांमध्ये तरूणांना नोकरी, त्यांना रोजगार– स्वरोजगार, त्यांच्या कौशल्य विकसनासाठी मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. युवकांसाठी २ लाख कोटी रूपयांच्या विशेष 'पीएम–पॅकेज'ची घोषणा करण्यात आली आहे. याचा लाभ ४ कोटींपेक्षा ही जास्त युवकांना होईल. आता कंपन्यांमधील पहिल्या नोकरीचा पगार सरकार देणार आहे.

**(पूर्वार्ध)**

# भारताची एक इंचही जमीन घेऊ देणार नाही



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील कच्छच्या खाडी क्षेत्रातल्या लक्की नाला इथे सीमा सुरक्षा दल, लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या शूर जवानांसोबत दिवाळीचा सण साजरा केला. अत्यंत दुर्गम ठिकाणी धैर्याने तैनात राहून आपले रक्षण करणाऱ्या आपल्या सुरक्षा जवानांचा अभिमान वाटत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

**कच्छमधील** या भागावर आपल्या देशाच्या शत्रूंची अनेक वर्षांपासून नापाक नजर आहे. मात्र आपल्या जवानांमुळे संपूर्ण देश पूर्णपणे निर्धास्त आहे. कारण या भागाची सुरक्षा तुम्ही करत आहात. १९७१ मध्ये येथे आपल्या जवानांनी भारताच्या शत्रूंना कसा धडा शिकवला होता, हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्यामुळे या भागाकडे आपले शत्रू वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करत नाहीत. सध्या देशात असे सरकार आहे की, जे देशाच्या एक इंच जमिनीबाबत कधीच तडजोड करणार नाही. आपले जवान प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत देशाच्या सीमांचे रक्षण करतात. त्यांच्या त्यागाची, शौर्याची आणि बलिदानाची देशाला जाणीव आहे.

आमच्या सरकारने देशाच्या सीमावर्ती भागात पायाभूत सुविधा तयार करण्यास प्राधान्य दिले आहे. सीमावर्ती भागात रस्ते, पूल यांची बांधणी गेल्या १० वर्षात प्रचंड वेगाने होत आहे. ८० हजार किलोमीटर एवढ्या लांबीच्या रस्त्यांची निर्मिती गेल्या काही वर्षात झाली आहे. गेल्या १० वर्षात लडाख, अरुणाचल प्रदेश यासारख्या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या भागात ४०० पूल बांधण्यात आले आहे. सुरक्षादल जवानांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना अत्याधुनिक शस्त्रे, शस्त्रास्त्रे, उपकरणे उपलब्ध करून दिली जात आहेत. लष्कराच्या तिन्ही दलांचे सामर्थ्य वाढवण्यासाठी आमचे सरकार काम करत आहे. खाडी क्षेत्रातले तापमान अत्यंत तीव्र असते, त्यामुळेच हा भाग आव्हानात्मक आणि दुर्गमही आहे. अशातच इथे पर्यावरण विषयक इतरही आव्हानांचा सामना करावा लागत असल्याचेही पंतप्रधानांनी यावेळी नमूद केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या खाडी क्षेत्रातील एका तरंगत्या सीमा चौकीलाही (Floating Border Outposts - BOPs) प्रत्यक्ष भेट दिली आणि तिथल्या शूर सुरक्षा जवानांना मिठाईचे वाटप केले. याबाबतच्या आपल्या अनुभवाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या समाज माध्यमावर लिहिलेले संदेश: गुजरातमधील कच्छमध्ये आपल्या शूर जवानांसोबत दिवाळी साजरी करत आहे. आपले सुरक्षा जवान अत्यंत दुर्गम ठिकाणी धैर्याने सज्ज राहून आपले रक्षण करतात, आम्हाला त्यांचा प्रचंड अभिमान वाटतो. कच्छच्या खाडी क्षेत्रातल्या लक्की नाला इथे आपल्या सीमा सुरक्षा दल, लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या शूर जवानांसोबत दिवाळीचा सण साजरा करताना खूपच आनंद झाला. हा भाग अत्यंत आव्हानात्मक आणि दुर्गमही आहे. इथे दिवस कडक उष्णतेचा असतो आणि प्रचंड गारठाही असतो. या खाडीच्या प्रदेशात पर्यावरण विषयक इतरही आव्हानांचा सामना करावा लागतो. या खाडी क्षेत्रातील एका तरंगत्या सीमा चौकीलाही प्रत्यक्ष भेट दिली आणि तिथल्या शूर सुरक्षा जवानांना मिठाईचे वाटप केले. ■







पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील कच्छच्या खाडी क्षेत्रातल्या लक्की नाला इथे सीमा सुरक्षा दल, लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या जवानांसोबत दिवाळीचा सण साजरा केला.



# ‘मविआ’ ला विकासाबद्दल बोलण्याची भीती का वाटते?

> विधानसभा निवडणूका आता तोंडावर आल्या आहेत. भारतीय जनता पार्टी-शिवसेना-राष्ट्रवादी या महायुतीने विधानसभा निवडणुकीत विकासकामांच्या आधारे मतदारांकडे कौल मागण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रातील मोदी सरकारने आणि राज्यातील महायुती सरकारने राज्यतील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पानांना गती देण्याबरोबर सामान्य माणसाच्या कल्याणाच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत.

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी हे गेल्या १० वर्षात सातत्याने विकासाचा कार्यक्रम घेऊनच जनतेपुढे येत आहेत. 'मन कि बात' सारख्या जनतेशी संवाद साधण्याच्या कार्यक्रमातही पंतप्रधान मोदी यांनी आपल्या सरकारच्या कल्याणकारी योजना, या योजनांचे सामान्य जनतेला झालेले फायदे, केंद्राच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे अनुभव या याविषयीच माहिती देत असतात. जनतेने आपल्याला सत्तेवर बसवले आहे म्हणूनच उत्तरदायित्वाच्या भावनेतून पंतप्रधान मोदी आपल्या सरकाच्या विकासकामाचा लेखा-जोखा नेहमीच मांडत असतात. महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत आणि आता विधानसभा निवडणुकीत केंद्र आणि महायुती सरकारच्या विकासाच्या कामगिरीवरील मुद्द्यांच्या आधारे चर्चा घडवून आणण्याऐवजी व्यक्तिगत टीका-टिप्पणी आणि नकारात्मक मुद्द्यांवरच प्रचार करण्याचे ठरविलेले दिसते आहे. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षातील अकार्यक्षमता, गैरकारभार यांची मनोमन तुलना करत




सामान्य मराठी माणूस या निवडणुकीत कामगिरीच्या आधारावर मतदान करण्यासाठी उतरला तर आपल्या पदरात मोठ्या अपयाशाखेरीज काही पडणार नाही याची खात्री असल्यानेच ‘मविआ’चे नेते विकासाच्या मुद्द्यावर बोलण्यास कचरत आहेत.

आता काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारची सलग १५ वर्षे आणि महायुती सरकारची साडे सात वर्षे ही तुलना केल्यावर काय दिसते? २०१४ पर्यंत मुंबई मेट्रोची फक्त एकच मार्गिका चालू होऊ शकली. त्या कामालासुद्धा १० वर्षे लागली. मा. मोदीजींनी २०१९ मध्ये मेट्रोच्या कामांचं उदघाटन केलं आणि मुंबईत ३३७ किमीच्या नवीन १० लाईन्सच्या कामांचं तातडीने काम सुरु झालं. त्यातील ४ लाईन्स सुरूही झाल्या. मुंबईकरांच्या वेळेत बचत. नागपूरसाठी कधी मेट्रोचा प्रस्तावसुद्धा ठेवला नाही. आपल्या सरकारने २४ स्टेशन्स असलेली २६.१ किमी लांबीची नागपूर मेट्रो ५ वर्षात तयार करून लोकार्पण सुद्धा केलं. रोज ८० हजार नागपूरकर मेट्रोने जलद आणि सुखकर प्रवास करू शकतात. पुणे शहरातील वाढती लोकसंख्या पाहता काँग्रेस-शरद पवारांनी सलग १५ वर्षे सत्ता असताना वाहतूक सुरळीत करण्यासाठी काहीच प्रयत्न केले नाहीत. पुणे मेट्रोसाठी त्यांनी कधीही पुढाकार

घेतला नाही. महायुती सरकारने पुणे मेट्रोचे काम जलदगतीने काम पूर्णही केलं. रोज तब्बल १ लाख पुणेकर करतात मेट्रोने प्रवास.

२०१४ पूर्वी- महाराष्ट्रात २,६३,७०८ कि.मी. चे रस्ते होते, ७ विमानतळ होते,रस्तेमार्गातून एकूण १४६२.९१ लाख मेट्रिक टन मालवाहतूक होत होती. २०१४ मध्ये फडणवीस सरकार आल्यानंतर ३,२५,४८९ कि.मी. रस्ते बांधले गेले, ५९३.४८ कि.मी. मेट्रो सुरु झाल्या, १३ विमानतळ सुरु झाले. धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (कोस्टल रोड)- मरीन ड्राइव्ह ते वांद्रे-वरळी सागरी सेतू- या प्रकल्पामुळे मरिन लाईन ते वांद्रे सी लिंक हा प्रवास केवळ १० मिनिटात पूर्ण होतो. अटल सेतूमुळे मुंबई ते नवी मुंबई प्रवासाचा वेळ २ तासांवरून २० मिनिटांपर्यंत कमी झाला.

२०१४ पूर्वी पाण्यासाठी गावेच्या गावे पूर्णपणे टँकरवर अवलंबून होती. सिंचनाच्या ढिसाळ नियोजनामुळे शेतकरी आत्महत्या होत होत्या. लातूर, बीड, परभणी, जालना इथे टँकरने पाणी पुरवण्याच्या बातम्या महाराष्ट्राला नवीन नव्हत्या. फडणवीस सरकार २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर जलयुक्त शिवार अभियान सुरु झाले.

२०२३-२४ पर्यंत, या प्रकल्पाचा १६,५०० गावांना आणि ३.३ दशलक्ष शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. दुष्काळग्रस्त भागांमध्ये शेतीचे उत्पादन वाढले. महायुती सरकारच्या काळात शेतीमध्ये क्रांतिकारी बदल घडून आले. मागेल त्याला शेततळे, मागेल त्याला फळबाग, मागेल त्याला तुषार सिंचन, मागेल त्याला आधुनिक पेरणीयंत्रे, मागेल त्याला सौरपंप, गाळयुक्त शिवार, गाळमुक्त धरण या योजनांमुळे आणि शेतीसाठी पूरक असलेल्या धोरणांमुळे फक्त खरीप नाही तर रब्बी पिकांचं उत्पादनसुद्धा वाढलं. सिंचनाखालचं क्षेत्र वाढलं.२०१४ पूर्वी ग्रामीण भागात दिवसातून १०-१२ तास बत्ती गुल होती, ग्रामीण भागात आठवड्यातून ४ दिवस भारनियमन होत असे. २०१४ नंतर-ग्रामीण भागात २४ तास वीजपुरवठा होतो आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी फडणवीस सरकारच्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख- सारथी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा विद्यार्थ्यांना भारतात उच्च शिक्षण घेण्यासाठी भरपूर मदत झाली. या योजनेअंतर्गत १७९ मराठा विद्यार्थ्यांना उच्च




शिक्षण घेण्यास मदत झाली. एकूण १.४७ कोटी रुपये वितरित केले गेले आहेत. प्रशासनामध्ये मराठा तरुणांचा टक्का वाढला. महाराजा सयाजीराव गायकवाड- सारथी शिष्यवृत्ती योजना सरकारने सुरू केली. सारथी योजनेतून मराठा समाजातील ५७ जण IS अधिकारी झाले तर १५ जण IPS अधिकारी झाले ३४८ जण RTO अधिकारी झाले. अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाची स्थापना झाली. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून १ लाख मराठा उद्योजक तयार झाले. १ लाख लाभार्थ्यांना ६ हजार कोटीपेक्षा अधिक कर्ज वाटप झाले.

राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ च्या खरीप हंगामासाठीचे अनुदान वितरण सुरु झाले आहे. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. सोयाबीनची ९० दिवसांनी हमीभावाने खरेदी करण्याच्या निर्णयापाठोपाठच केंद्र सरकारने खाद्य तेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीनला चांगला भाव मिळेल. सत्तेत असताना वरील मुद्द्यांबाबत आपण काय केले याची पूर्ण जाणीव ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे यांना आहे. या मुद्द्यांबाबत प्रचारात चर्चा करणे अडचणीचे आहे हे लक्षात आल्याने भावनात्मक मुद्दे आणि खोटा प्रचार यावरच मविआचा भर राहणार असल्याचे दिसते आहे. अर्थात महाराष्ट्रातील सुजाण मतदार विकासाच्या मुद्द्यालाच प्राधान्य देईल याची खात्री आहे. ■

# 'उबाठां'च्या राजकारणाची गोळाबेरीज

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर जागा वाटपावरून अपेक्षेप्रमाणे उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेतृत्व यांच्यात रस्सीखेच चालू झाली आहे. ही रस्सीखेच उद्धव ठाकरे यांच्या राजकीय विश्वासार्हतेविषयी नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे. जागा वाटपाच्या खेळात काँग्रेस आणि शरद पवार यांच्यापुढे नमते घेऊन १०० पेक्षा कमी जागा पदरात पाडून घ्याव्या लागल्या आहेत. निवडणुकीत स्वबळावर उतरण्याचं धाडस उद्धव ठाकरे यांना दाखवता आले नाही. या साऱ्या खेळात उद्धव ठाकरे यांना भारतीय जनता पार्टीबरोबरची युती तोडून हातात काय पडले, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ येणार आहे.

**१९८९** ते २०१४ ची लोकसभा निवडणूक या २५ वर्षाच्या प्रवासात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला 'थोरल्या भावा'चेच स्थान मिळाले. विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला १७१ आणि भारतीय जनता पार्टीला ११७ या सूत्रानुसार १९९० ते २००९ पर्यंतच्या विधानसभा निवडणुकीत जागा वाटप झाले. ज्याच्या जास्त जागा निवडून येतील, त्या पक्षाचा मुख्यमंत्री यावर वंदनीय बाळासाहेब आणि तत्कालिन भाजपाचे नेतृत्व करणारे प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांचे एकमत झाले होते. या सूत्रानुसार १९९५ मध्ये युतीची सत्ता आल्यावर शिवसेनेकडे मुख्यमंत्रीपद तर



भारतीय जनता पार्टीकडे उपमुख्यमंत्रीपद आले. भारतीय जनता पार्टीने २०१४ मध्ये या जागा वाटपाच्या सूत्रामध्ये थोडा बदल करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांच्याकडे केल्यावर उद्धव ठाकरे यांनी कमालीचा ताठरपणा दाखवत भारतीय जनता पार्टीची मागणी फेटाळत स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याचा निर्णय जाहीर केला. भारतीय जनता पार्टीने राज्यातील बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन १४० ते १४५ जागा मित्रपक्षांसह मेळाव्यात अशी मागणी केली होती.

२०१४ ची विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी त्या निवडणुकीच्या प्रचारात भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वावर असभ्य भाषेत टीका करणे सुरू केले. जागा वाटपाची बोलणी फिसकटली तरी उद्धव ठाकरे यांनी भाजपाबरोबरची २५ वर्षाची युती लक्षात घेत भाजपा नेतृत्वावर बोलताना किमान संयम ठेवणे अपेक्षित होते. मात्र उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तोपर्यंत क्रमांक १ चा शत्रू असणाऱ्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याऐवजी भारतीय जनता पार्टीलाच टीकेचे लक्ष्य केले. उद्धव ठाकरे यांच्याकडून अत्यंत खालच्या पातळीवरची टीका होऊनही भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने वंदनीय बाळासाहेबांचे चिरंजीव असल्यामुळे आम्ही उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करणार नाही, अशी समंजस भूमिका घेतली. विधानसभा निवडणुकीत झाले गेले विसरून जाऊन भाजपा नेतृत्वाने उद्धव ठाकरे यांना राज्य सरकारमध्ये सामील करून घेतले. केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीबरोबर सत्तेत असणाऱ्या उद्धव ठाकरेंनी मोदी सरकार आणि




भाजपा नेतृत्व यावर गरळ ओकणे चालूच ठेवले. केंद्र आणि राज्यात आपण सत्तेत एकत्र आहोत, हे लक्षात घेऊन भाजपा नेतृत्वाने २०१७ च्या मुंबई महापालिकेसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका युती म्हणून लढवण्याचा प्रस्ताव उद्धव ठाकरेंपुढे ठेवला होता, मात्र आपल्या ताकदीबाबत कमालीचा भ्रम असणाऱ्या उद्धव ठाकरेंनी प्रचंड अहंकार दाखवत भाजपाचा प्रस्ताव फेटाळला. मुंबईत आमची ताकद अधिक, असा दावा करणाऱ्या उद्धव ठाकरेंना मुंबई महापालिका निवडणुकीत मतदारांनी मोठा धक्का दिला. भारतीय जनता पार्टीला शिवसेनेपेक्षा अवघ्या ३ जागा कमी मिळाल्या.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीचे वेध लागेपर्यंत उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयावर अनाठायी, जहरी टीका करणे चालू ठेवले होते. नोटबंदी म्हणजे आर्थिक हत्याकांड यासारख्या भाषेतून 'दै.सामना'मधून मोदी सरकारवर टीका करण्यात येत होती. असे असूनही हिंदुत्वाच्या व्यापक भूमिकेतून भारतीय जनता पार्टीने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्यापुढे युतीचा प्रस्ताव ठेवला. त्यानंतरचा इतिहास विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर कसा घडला, हा तपशील सर्वांना ठाऊक आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा अधिक जागा मिळाल्या. या यशाचे श्रेय आपले एकट्याचेच आहे, असा समज करून घेत उद्धव ठाकरेंनी आपल्याला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून जाहीर करावे, असा हट्ट काँग्रेस आणि शरद पवार यांच्याकडे धरला. काँग्रेस आणि शरद पवार यांनी या 'बालहट्टाला' भीक घातलेली नाही. शरद पवार आणि काँग्रेस नेतृत्वाने आपल्या मागणीकडे वारंवार दुर्लक्ष केले तरी उद्धव ठाकरे हे पुन:पुन्हा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याच्या मागणीवर अडून बसले होते. यातून आपले हसे होत असे, याचीही पर्वा उद्धव ठाकरेंना नाही. लोकसभा निवडणुकीतील यश उद्धव ठाकरेंमुळे नव्हे तर काँग्रेसच्या परंपरागत आणि मुस्लिम मतदारांमुळे मिळाले आहे, हे उद्धव ठाकरेंनी लक्षात घ्यावे, असे जाहीर वक्तव्य काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्याने केले आहे. स्वाभिमानाच्या, अस्मितेच्या बाता उठता-बसता करणाऱ्या उद्धव ठाकरे आणि त्यांच्या एकाही सहकाऱ्याने काँग्रेसच्या या भूमिकेवर आक्षेप घेतलेला नाही. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करणार नाही, असे सांगत उद्धव ठाकरेंना झिडकारणाऱ्या काँग्रेस व शरद पवार यांच्याबद्दल उबाठा गट मूग गिळून गप्प आहे. स्वाभिमान, मान-सन्मान याची वस्त्रे खुंटीला अडकवून उद्धव ठाकरे महाविकास आघाडीला लोंबकळत राहिले आहेत. उद्धव ठाकरे यांना काँग्रेस आणि शरद पवार देतील त्या जागा निमूटपणे मान्य करणे किंवा २०१४ प्रमाणे पुन्हा स्वबळावर मैदानात उतरणे, यापैकी एक पर्याय निवडावा लागणार होता. आपल्या ताकदीबाबत उद्धव ठाकरेंना अजूनही मोठा भ्रम असल्याने ते काँग्रेस व शरद पवार यांनाही धोबीपछाड देण्यास कमी करणार नाहीत. मुख्यमंत्रीपद अडीच वर्षात नाईलाजाने सोडावे लागल्याने उद्धव ठाकरेंची सत्तेची हौस अजून पूर्ण झालेली नाही. त्यासाठी ते वाटेल ते करण्याची शक्यता अधिक आहे. या सगळ्या खेळात आपण काय मिळवले, याची गोळाबेरीज करायला बसल्यावर उद्धव ठाकरेंना आपण केलेल्या 'वजाबाक्यांची' किती मोठी किंमत मोजावी लागली आहे, हे कदाचित त्यांना लक्षात येऊ शकेल. मात्र ही गोळाबेरीज पूर्णपणे प्रामाणिकपणे केली तरच त्यांना राजकारणाच्या सारीपाटावर आपण फक्त प्यादे म्हणून का उरलो, हे कळू शकेल. ■

# जलद निर्णय, कार्यक्षमता आणि पारदर्शकता ही 'एनडीए सरकारची' वैशिष्ट्ये




राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्र्यांची बैठक नुकतीच चंदीगड येथे झाली. हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्या शपथविधी कार्यक्रमानिमित्ताने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश.

**१९७५** नंतर प्रथमच काँग्रेसविरोधी पक्षांचे प्रतिनिधी इतक्या मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय पातळीवर एकत्र आले आहेत. या बैठकीत १७ मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. अशा बैठका वर्षातून दोनदा आयोजित केल्या जाव्यात, असे मला वाटते. अशा बैठकातून सरकारी निर्णय, धोरणे याची माहिती परस्परांना कळते. त्याचबरोबर एखाद्या राज्यात तेथील सरकारने प्रशासन आणि लोकसहभागाच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणलेल्या लोकोपयोगी निर्णयांची माहितीही एकमेकांना समजते. हरयाणातील विधानसभा निवडणुकीत मिळालेला विजय अनेक अर्थाने संस्मरणीय आणि ऐतिहासिक आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने आपल्या कारभाराद्वारे लोकांचा विश्वास आणि पाठिंबा मिळवला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी शेतकरीविरोधी असल्याचा खोटा प्रचार विरोधकांनी अनेक दिवसांपासून सुरू ठेवला आहे. विरोधकांच्या या प्रचारावर विश्वास न ठेवता शेतकऱ्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भरघोस पाठिंबा दिला आहे. विरोधी पक्षांनी हरयाणात केलेल्या नकारात्मक राजकारणाला नाकारल्याबद्दल मी हरयाणाच्या जनतेचे आभार मानतो. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा सुशासन आणि विकासाचा कार्यक्रम जनतेला पसंत आहे, असाच संदेश हरयाणाच्या मतदारांनी मतपेटीतून दिला आहे. सामान्य माणसाच्या सरकारकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांनी नेहमीच प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. २०१४ पासून भारतीयांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीवर जो विश्वास प्रकट केला आहे तो सार्थ ठरवण्याचे काम राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारांनी विविध राज्यांमध्ये केले आहे.

सरकारने आपले प्रश्न, समस्या वेगाने सोडवाव्यात, एवढीच सामान्य माणसाची अपेक्षा असते. सामान्य माणसाच्या प्रश्नांचे आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारांनी सु-शासनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. सरकारी यंत्रणेकडून, प्रशासनाकडून सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यासाठी




आम्ही कार्यक्षम व्यवस्था तयार केली आहे. ही व्यवस्था राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित सरकारांचे प्रमुख वैशिष्ट्ये बनले आहे. सामान्य माणसाच्या मनात सरकारबद्दल, सत्ताधाऱ्यांबद्दल विश्वास निर्माण झाला तर सामान्य माणूस सरकारशी आपल्या प्रश्नांबाबत संपर्क साधतो. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकार केंद्रात सत्तेत असताना १० वर्षात सामान्य माणसाकडून पंतप्रधानांना ५ लाख पत्रे पाठविली गेली होती. मात्र गेल्या १० वर्षात मला ४ कोटी ५० लाख एवढ्या प्रचंड संख्येने पत्रे पाठिविली गेली. पत्रांच्या या प्रचंड संख्येवरून सामान्य माणसाला राष्ट्रीय लोकशाही आघाडीबद्दल वाटणारा विश्वास दिसून येतो आहे. आपले प्रश्न या सरकारकडून सोडवले जातील, अशी खात्री असल्यामुळेच पंतप्रधान कार्यालयाशी व केंद्र सरकारच्या अन्य मंत्रालयांशी सामान्य माणूस संपर्क साधतो आहे. नागरिकांना केंद्र आणि राज्यातील सरकारकडून जलद निर्णयाची अपेक्षा असते. ही अपेक्षा राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित सरकारांनी पूर्ण केली आहे. त्याचबरोबर सामान्य माणसाला सरकारी कारभारात पारदर्शकताही हवी असते. ही अपेक्षाही आम्ही पूर्ण केली आहे. सरकारी योजनांचे अनुदान, अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणारी प्रणाली आमच्या सरकारने विकसित केली आहे. केंद्र सरकारबरोबर अन्य राज्यांच्या योजनांचे अनुदान, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते आहे. त्यासाठी लाभार्थ्यांना सरकारी कार्यालयात खेटे खालावे लागत नाहीत तसेच कोणा मध्यस्थालाही लाज द्यावी लागत नाही. यालाच म्हणतात पारदर्शक कारभार. या सुशासनामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेत असलेल्या राज्यांमध्ये गुंतवणूक वेगाने वाढू लागली आहे. परदेशी गुंतवणुकदारांनाही राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सत्ता असलेल्या राज्य सरकारांबद्दल विश्वास वाटू लागला आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सत्ता असलेल्या सरकारांनी एकमेकांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून नियमित संपर्क आणि समन्वय ठेवणे आवश्यक बनले आहे. या सरकारमध्ये मंत्री असलेल्यांनी तसेच आमदारांनीही परस्परांशी संपर्क ठेवल्यास आपआपल्या राज्यात घडणाऱ्या चांगल्या घडामोडींची माहिती एकमेकांना मिळू शकेल. सरकार चालवताना आपण लोकसहभागाचे (जनभागीदारी) तत्व नेहमीच लक्षात ठेवले पाहिजे. लोकसहभागामुळे सरकारवरील कामाचा भार आपोआप कमी होतो, असे अनुभवास आले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सत्ता असलेल्या सर्व राज्य सरकारांनी युवक वर्गाशी थेट संपर्क ठेवल्याबद्दल मी संबंधितांचे अभिनंदन करतो. युवक वर्गाला सहभागी करूनच विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणता येईल, याची तुम्हा-आम्हा सर्वांना कल्पना आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सत्ता असलेल्या सरकारांनी टीबीमुक्त भारत प्रत्यक्षात आणण्यासाठी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे, मोठ्या शहरांचे ग्रोथ इंजिनमध्ये रूपांतर करणे, पर्यटनाला प्रोत्साहन देणे यासारख्या कार्यक्रमांकडेही राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारांनी लक्ष दिले पाहिजे. आपली सत्ता असलेल्या राज्यामंध्ये सर्वाधिक स्वच्छ पर्यटनस्थळे निर्माण करण्यासाठी स्पर्धा लागली पाहिजे. कोणत्या राज्यात सर्वात स्वच्छ रुग्णालये आहेत यासाठीही परस्परात निकोप स्पर्धा असली पाहिजे. आपण यापुढेही विकासाच्या सकारात्मक कार्यक्रमाच्या आधारे वाटचाल करू, असा विश्वास मला आहे.

**धन्यवाद!**

# राष्ट्रहित, शेतकरीहित सर्वोपरी!



● मकरंद कोर्डे-पाटील

भारत कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतकरी, शेतमजूर, कामगार या वर्गाला केंद्रस्थानी ठेवून विकास योजना राबविण्याची गरज होती. प्राधान्याने सोयी, सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज होती. स्वातंत्र्यानंतर देशात अस्तित्वात आलेल्या सरकारने याकडे लक्ष देण्याची गरज होती, परंतु काँग्रेसच्या काळात तसे झाले नाही. शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित, पीडित, शोषित समाजाला लाभ देण्याची सुरुवात अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना झाली व हेच धोरण व्यापक स्वरूपात गतिमान पद्धतीने पुढे नेण्याचे काम २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने सुरू ठेवले. हेच धोरण तेव्हाचे फडणवीस सरकार व आजचे शिंदे सरकार राबविताना दिसते आहे.

**संविधानात** समाजातील शेवटच्या घटकाला दलित, पीडित, शोषित समाजाला अत्यावश्यक गरजा अन्न, वस्त्र, निवारा, देशाची सुरक्षा व समानता आदी बाबी देणे आवश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत अंत्योदय योजना पोहोचलीच पाहिजे, असा भारतीय जनसंघाचे अध्यक्ष आणि एकात्म मानवतावादाचे पुरस्कर्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा आग्रह होता. संविधानही हेच सांगते. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनीही हाच विचार घेऊन काम केले. २०१४ पासून देशाचे नेतृत्व

करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी याच विचारधारेनुसार काम करत आहेत. ठळकपणे सांगायचे झाले तर शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान किसान सन्मान निधीतून दरवर्षी सहा हजार रुपये देण्याची योजना नरेंद्र मोदी यांनीच आणली. हीच योजना राज्य सरकारने राबविली. स्वस्त धान्य दुकानांतून मोफत धान्य दिले जाते. कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळावा यासाठी मिलेट म्हणजेच भरड धान्य जागतिक स्तरावर नेऊन कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीमालाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली. उज्वला गॅस योजनेतून महिलांना गॅस दिला गेला. विश्वकर्मा कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून बारा बलुतेदारांना पारंपरिक व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून करता यावा यासाठी भांडवल देण्यात आले. कामगारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली व कामगारांना त्यांच्या कामासाठी आवश्यक टुलकिटचे वाटप करण्यात आले.

असे विचारले जाऊ शकते की या योजना सगळ्यांना माहीतच आहेत. बरोबर आहे, परंतु सर्वांना समान न्याय, अधिकार हेच तर संविधानात सांगितले आहे. भारतीय जनता पक्षाची सरकारे फक्त घोषणा करत नाहीत तर प्रत्यक्षात काम करतात. वरील काही योजनांची यादी पाहता संविधानात अपेक्षित देशातील नागरिकांच्या हिताची कामे केंद्रात मोदी व राज्यात महायुती सरकार करत आहे. असे असताना, संविधान बदलणार ही चुकीची कथा लिहिली गेली. नॅरेटिव्ह सेट केले गेले. लोक सहमत होत नसतील तर त्यांना गोंधळवून टाका या नीतीचा वापर केला जाऊ लागला आहे.

महिनाभरापूर्वी असेच नॅरेटिव्ह सेट केले गेले. नाफेड महाराष्ट्राच्या बाजारात कांदा उतरविणार अशी अफवा पसरविली गेली. परिणामी कांद्याचे भाव पडले. भाव पाडण्याचे षड्यंत्र महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या विरोधकांनी केले. परंतु याचा फटका शेतकऱ्यांना बसला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले. दुसऱ्या प्रकारात महाराष्ट्रातीलच भाजपच्या, महायुती सरकारच्या विरोधकांनी दिल्लीत कांदा महाग झाला म्हणून आरडाओरडा केला. संसदेत सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. विरोधकांचे हे दुटप्पी वागणे फक्त आणि फक्त राजकारणासाठी, सत्ता मिळविण्यासाठीच आहे. शेतकऱ्यांच्या भल्यासाठी निश्चितच नाही.



भाजप विरोधकांचे असे षड्यंत्र पाहता, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी 'विरोधकांनी संविधान बदलाबाबत नॅरेटिव्ह पसरविले होते,' अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यांचे असे म्हणणे अगदी बरोबरच आहे. 'इस देश मे, दो विधान, दो संविधान, दो निशान नहीं चलेंगे,' ही घोषणा कलम ३७० हटविण्यासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी दिली होती. काश्मीर भारताचे अविभाज्य अंग असताना त्याला भारतापासून वेगळे ठेवण्याचे पाप काँग्रेसने व पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जाणीवपूर्वक केले. स्वातंत्र्यानंतर नेहरू व काँग्रेसने संविधान बदलास व दोन संविधाने अस्तित्वात आणण्यास सुरुवात केली. नेहरूंच्या विशिष्ट समाजाचे लांगूलचालन करण्याच्या भूमिकेमुळे काश्मिरी पंडितांना विस्थापित व्हावे लागले. त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी झाली. त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले. हे संविधानाच्या विरोधात नव्हते का? नक्कीच संविधानाच्या विरोधात होते. परंतु काँग्रेस व त्यांच्या डाव्या विचारसरणीच्या समर्थकांनी याबाबत कधीच तोंड उघडले नाही. उलट अन्याय अत्याचार करणाऱ्यांना पाठिंबा दिला. आणि आज याच काँग्रेसचे मुखिया राहुल गांधी व त्यांचे समर्थक भारतीय जनता पक्ष संविधान बदलणार असल्याचे सांगत फिरतात. देश एकसंध असेल, तरच राष्ट्रहिताला अधिक बळकटी मिळू शकेल, हे लक्षात घेऊन मोदी सरकारने अनुच्छेद ३७० रद्द करून समान न्यायाची भूमिका घेतली. एक देश, एक विधान, एक संविधान, एक



निशान हे ब्रीद कायम ठेवून संविधानास अनुसरून काम केले. तरीही भाजप संविधान बदलणार आहे, असा अपप्रचार लोकसभा निवडणुकीत केला गेला.

प्रभु श्रीरामचंद्र हे देशातील सर्व समाजांचे आराध्य दैवत आहेत. सोशल इंजिनीअरिंगचा, सामाजिक समतेचा पहिला प्रयोग त्यांनीच केला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वनवासात जाताना त्यांनी जंगलात वास्तव्य करणाऱ्या सुतार, लोहार, भिल्ल, मल्लाह आदींना एकत्रित करून त्यांच्याकडून, धनुष्यबाण, भाला, ढाल तयार करून घेतले. या शस्त्रांच्या साहाय्याने त्यांना लढण्यास व आत्मरक्षण करण्यास शिकविले. त्यांना सोबत ठेवले. अशा प्रभु श्रीरामचंद्रांचे भव्य मंदिर त्यांचे जन्मस्थान असणाऱ्या अयोध्येत देशातील तमाम हिंदू बांधवांच्या श्रमाने, त्यागाने, बलिदानाने उभे राहिले. त्या कार्यक्रमास काँग्रेसी व डावे गेले नाहीत. देशातील बहुतांश लोकांची श्रद्धा असणाऱ्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याची हिंमत केली गेली. याबद्दल त्यांना कुणीही विचारत नाही. उलटपक्षी ठरावीक घटकांना प्रतिष्ठापना कार्यक्रमास बोलाविल्याचा दावा केला जातो. उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री मुलायम सिंह यादव यांच्या कार्यकाळात कारसेवक, साधू, संतांच्या गोळ्या घालून हत्या केल्या गेल्या होत्या. कारसेवकांना रेल्वेत जाळून मारले गेले होते, याचे जाणीवपूर्वक विस्मरण होते. राम मंदिर उभारणी व प्रतिष्ठापनेच्या कार्यक्रमावर आक्षेप घेणारे व बिल्कीस बानो, सीएए, एनआरसीवर विरोधात बोलणारे कारसेवकांची हत्या किंवा अलीकडच्या काळात पालघर जिल्ह्यात झालेल्या साधूंच्या हत्यांबाबत काहीही बोलत नाहीत.

या देशात धर्मनिरपेक्षता हिंदू संत, महात्मे यांच्या पुरती मर्यादित आहे का? बिल्कीस बानो, एनआरसी, सीएएबद्दल बोलले जाते, मात्र तमिळनाडूत हत्या व बलात्काराचा खोटा आरोप ठेवून सोनिया गांधींच्या इशाऱ्यावर तेथील तत्कालीन सरकार शंकराचार्यांना अटक करते, तेव्हा ही धर्मनिरपेक्ष मंडळी गप्प बसतात. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मुस्लीम समाज भाजपच्या विरोधात एकवटतो तेव्हा त्यांचे लांगूलचालन केले जाते. राम मंदिर, अनुच्छेद ३७० रद्द केल्याचा मुद्दा मांडून भाजपचे विरोधक संविधान धोक्यात आल्याचे नॅरेटिव्ह सेट करतात. मग फडणवीस म्हणाले, त्यात चूक ते काय?

राजकीय पक्ष विस्तारवादी असतात. पक्ष विस्ताराचे प्रयत्न सातत्याने केले जातात. सदस्य संख्या, मतांची टक्केवारी, लोकप्रतिनिधीची संख्या वाढल्याने पक्षाची लोकप्रियता अधोरेखित होते. तीनशे पार नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चारशे पारची घोषणा करणे ही नियमित व सामान्य बाब आहे. पराभवाच्या मानसिकतेमध्ये असलेल्या भाजपविरोधकांनी याला संविधान बदलणार असल्याचे रूप दिले आणि देशाची दिशाभूल केली. हा निवडणुकीचा मुद्दा बनविला गेला. काही वाचाळवीरांच्या वक्तव्यांमुळे विरोधकांच्या नॅरेटिव्हला बळ मिळत गेले. राजकीय पक्ष, सामाजिक, कामगार संघटना किंवा एखाद्या संस्थेत सहभागी सदस्य, कार्यकर्ते ठरावीक विचाराने प्रेरित होऊन एकत्र येतात. एखादा प्रमुख विचार, अजेंडा घेऊन एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये छोट्या-मोठ्या विषयांवर मतभिन्नता असू शकते. अशा वेळी एखाद्याने प्रमुख विषयाला सोडून आपला वेगळा विचार किंवा मत व्यक्तिगत फायद्यासाठी व्यक्त केले असेल, मांडले असेल तर त्यासाठी संपूर्ण संघटनेला जबाबदार धरणे योग्य नाही. आजच्या परिस्थितीत सावज पकडण्यासाठी टपून बसायचे व थोडे काही तरी सापडले की त्या संघटनेला बदनाम करण्यासाठी तुटून पडायचे ही पद्धत रूढ झाली आहे. भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बाबतीत हा प्रयोग सातत्याने सुरू असतो. परंतु आता हे लोकांच्याही लक्षात आले आहे.

**(श्री. कोर्डे-पाटील हे प्रदेश भाजपा किसान मोर्चाचे सरचिटणीस आहेत.)**

# ‘मविआ’ ने राज्याबाहेर घालविलेल्या उद्योगांची ‘कथा’




● प्रकाश गाडे

> मागील काही दिवसापासून विरोधकांनी एकसारख्या खोट्या बातम्या 'एअर बस टाटा' आणि फॉक्सकॉन संदर्भात खोटा प्रचार करत आहेत. त्यात पत्रकार देखील मागे नाहीत. राग या गोष्टीचा नाही की, ते सरकार विरोधात बोलत आहेत. राग या गोष्टीचा आहे की, ते १०० खोट्या बातम्या देत आहेत. यांना माहिती आहे आता खोटी बातमी दिली ती अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली खपून जाईल. याच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरफायदा देशात सर्वाधिक जे कोणी घेत असतील तर ते आहेत विशिष्ट पक्षांची बाजू घेणारे पत्रकार.

**माझा** या पत्रकारांना प्रश्न आहेत की एखादा प्रकल्प तयार करण्यासाठी किती दिवस लागतात? किती महिने लागतात? याचा अभ्यास केला आहे का? उदाहरण घ्यायचं झालं तर एखादी न्यूज एजन्सी काढायची म्हटलं तर ती ४ महिन्यात काढून तयार होईल का? याच उत्तर हे पत्रकार देणार आहेत का? उत्तर नाहीच आहे. एखादी न्यूज एजन्सी सुरू करायची ठरवल तर किमान १ ते दीड वर्षे कालावधी जातो. मग हेच हजारो-लाखो कोटीचे प्रकल्प महाराष्ट्रातून बाहेर जातात व तिथे गेल्यावर प्रकल्पाची पायाभरणी फक्त ४ महिन्यात करतात का? टाटा एअर बस या प्रकल्पाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. तेंव्हा राज्यातील विरोधी पक्षाला जाग आली की, अरे हा तर प्रकल्प गुजरातमध्ये गेला. त्या आधी झोपलेले होते सर्व. एखादा प्रकल्प सुरू होण्याआधी

फॉक्सकॉन

फॉक्सकॉनने पहिले पत्र महाराष्ट्राला लिहिले ५ जानेवारी २०२२ ला. संपूर्ण घटनाक्रम समजून घ्या.

५ मे २०२२ : फॉक्सकॉनकडून दुसरे पत्र

१४ मे २०२२ : उद्योग विभागाकडे फॉक्सकॉनचा रितसर अर्ज

२४ मे २०२२ : दावोस येथे प्रतिनिधी मंडळाची वेदांता समूहाशी चर्चा

२४ मे २०२२ : तळेगाव येथील जागेची पाहणी

१३ जून २०२२ : फॉक्सकॉनला पॅकेज (पण, उच्चस्तरिय समिती आणि मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता नसलेले, जी बैठक उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असेपर्यंत म्हणजे २९ जून २०२२ पर्यंत एकदाही झाली नाही.)

२४ जून २०२२ : फॉक्सकॉन समूहाच्या अध्यक्षांशी तत्कालिन उद्योगमंत्र्यांची चर्चा.

राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात महायुतीचे सरकार आल्यावर १४ जुलै रोजी वेदांता समूहाकडून पहिले पत्र आले. २६ जुलैला मुख्यमंत्री कार्यालयात बैठक झाली आणि लगेच उपसमितीची बैठक घेत, ३८,००० कोटींचे पॅकेज मंजूर केले. पण, हा प्रकल्प महाराष्ट्रात येणारच नाही, असे त्यावेळचे उद्योगमंत्री वारंवार सांगत होते. (सोबत त्यासंदर्भातील 'टाईम्स ऑफ इंडिया'चे ७ जानेवारी २०२० रोजीचे वृत्त : https://timesofindia.indiatimes.com/city/mumbai/foxconn-wont-set-up-proposed-unit-in-maharashtra-says-shiv-sena-minister/articleshow/73133222.cms )

टाटा एअरबस, फॉक्सकॉन असो, किंवा अन्य प्रकल्प सातत्याने खोटे बोलून मविआच्या नेत्यांनी दिशाभूल केली. सॅफ्रॅनच्या बाबतीत तर कहरच केला होता. कंपनीने २ मार्च २०२१ लाच हैदराबादेत त्यांच्या प्रकल्पाचे उदघाटन केले होते. पण, आमचे सरकार आल्यावर तोही प्रकल्प गुजरातला गेल्याची आरोळी उठवली गेली. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात एक पत्रपरिषद घेतली होती. (ती पत्रकारपरिषद पुन्हा ऐकायची असेल तर त्याची ही लिंक : https://youtube.com/watch?v=pEp5UJRSJHM[2]) सर्व मुद्यांचे सविस्तर सादरीकरण केले होते. पण, पुन्हा पुन्हा खोटे बोलून तोच तो अजेंडा सांगितला जात आहे. स्वत:जवळ काही सांगण्यासारखे नसले तर खोट्याशिवाय कशाचाच सहारा नसतो, हेच सत्य आहे. असू द्या. एकिकडे ५२ टक्के परकीय गुंतवणूक राज्यात आणणारे सरकार आहे आणि दुसरीकडे गुजरातच्या ब्रँड ॲम्बॅसिडरच्या भूमिकेतील कर्तव्यशून्य महाविकास आघाडी. राज्यातील जनताच याचा निकाल २० नोव्हेंबरला लावेल.

काय काय करावं लागतं याची आधी माहिती घेऊया.

एखादा प्रकल्प तयार करण्यासाठी त्या प्रकल्पाची गरज आहे का? त्या प्रकल्पासंदर्भात समस्या, गरज, महत्व, गृहितके, उद्दिष्टे, व्याप्ती आणि मर्यादा या सर्व गोष्टींचा अभ्यास होतो. फक्त रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने कोणताही प्रकल्प होत नाही. यात नाही म्हटलं तरीही किमान १ वर्ष सहज निघून जाते.

त्यानंतर दुसरा टप्पा येतो प्रकल्पाला लागणारे संसाधन, संशोधन पद्धती, सर्वेक्षण, नियोजन, आर्थिक नियोजन (कॉस्टिंग) याबाबतीत संपूर्ण नियोजन करून प्रकल्पासाठीचा एकूण खर्च काढला जातो. हे करताना प्रकल्प कोणत्या राज्यात सुरू करायचा आहे त्या ठिकाणच्या राजकीय, भौगोलिक, आर्थिक या सर्वांचा अभ्यास केला जातो. जिथे कमी खर्चात कंपनी प्रकल्प उभा करु शकते त्या राज्याला, प्रथम प्राधान्य दिले जाते. लाखो, हजारो कोटींची गुंतवणूक ४ महिन्यात होते का? असं करायला उद्योगपती हे काय उद्धव ठाकरेसारखे बिनडोक आहेत का? आता बघूया कोणता प्रकल्प कधी कुणाच्या काळात आला, याबद्दल माहिती घेऊया.

टाटा एअर बस

भारताने १२६ C-२९५ Medium Combat ircraft साठी विविध निविदा मागवल्या होत्या. त्यासाठी एयरबसची निवड करण्यात आली. मोदीजींनी २०१५ साली एयरबसच्या फॅक्टरीला भेट दिली. त्यावेळी या विमानांचा स्पेनमधून पुरवठा करण्याचा प्रस्ताव एयरबसने ठेवला. २०१७ मध्ये मेक इन इंडिया अंतर्गत यातील काही विमाने भारतात बनवायची मागणी भारत सरकारने केली.

त्यानंतर टाटा समूहासोबत सामूहिक भागीदारी करून एयरबसने २०२० मध्ये भारतात प्रकल्प सुरू करण्यासाठी पाहणी सुरु केली. २०२० मध्ये टाटा एअर बसने महाराष्ट्रासह बंगळुरु हैदराबाद, गुजरात आणि उत्तर प्रदेशमध्ये जागेची पाहणी सुरू केली.

२०२० मध्ये उद्धव ठाकरे सरकारने कोणताही प्रस्ताव टाटा एअर बसकडे दिल्याची नोंद नाही आणि कोणत्याच प्रकारचा पत्रव्यवहार देखील केला नाही. एकूण काय तर मविआ सरकारला टाटा एअर बस प्रकल्पा संदर्भात कोणतीही माहिती नव्हती. सप्टेंबर २०२१ मध्ये बंगळूरू, हैदराबाद, गुजरात आणि उत्तर प्रदेश येथील प्रस्ताव तपासून ढोलेरा येथे प्रकल्प सुरू करण्याचा प्राथमिक निर्णय घेतला. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील सरकारने 'टाटा एअर बस'शी कोणत्याही पद्धतीचा संपर्क साधला नाही. ठरल्याप्रमाणे टाटा एअर बसने गुजरात सरकार सोबत २४ सप्टेंबर २०२१ मध्येच सामस्यंज करार केला होता. जेंव्हा सामस्यंज करार होतो तेंव्हा प्रकल्प हा फक्त भूमिपूजन करून सुरू होण्याच्या तयारीत असतो.

वर्ष २०२२ उजाडले तेंव्हा ही, खरं सांगायचं तर फेब्रुवारी २०२२ पर्यंत महाराष्ट्र सरकारला 'टाटा एअर बस' नावाचा प्रकल्प आहे याची कल्पना सुद्धा नव्हती. फेब्रुवारी २०२२ ला पुन्हा एकदा प्रकल्पाचे पुन्हा विश्लेषण करण्यात आले. यावेळी सुद्धा महाराष्ट्र सरकारकडून कोणीही एयरबसच्या अधिकाऱ्यांना भेटल्याची नोंद नाही.

पण, जेंव्हा सत्तांतर झालं तेंव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'टाटा एअर बस' प्रकल्प संदर्भात पंतप्रधान मोदीजी यांच्याशी चर्चा केली. तुम्हाला प्रश्न पडला असेल की, प्रकल्प गुजरातमध्ये गेला तर आता चर्चा का केली? आदित्य ठाकरे ने जी पत्रकार परिषद घेतली यात सरळ सरळ खोटं बोलत होता उदय सामंत यांच्या नावाचा उल्लेख करत आदित्य ठाकरेंनी खोटी माहिती दिली. देशातील आणि राज्यातील जनतेला माहिती असणे गरजचे आहे. टाटा एअर बस प्रकल्प देशात ६ ठिकाणी होणार आहेत. आदित्य ठाकरे व त्याच्या पिताश्रींना याबद्दल माहिती नाही. म्हणून मंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या संदर्भाचा जाणीवपूर्वक चुकीचा अर्थ लावून वाद निर्माण केला. खर तर उद्धव ठाकरेना संधी होती टाटा एअर बस प्रकल्प महाराष्ट्रात आणण्याची. पण, त्यांनी तस केलं नाही.

सप्टेंबर २०२२ मध्ये एयरबसच्या प्रकल्पासाठी (६ प्रस्तावित प्रकल्प आहेत) महाराष्ट्र सरकार उत्सुक असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करून पुढील प्रकल्प महाराष्ट्रात यावा यासाठी भेटून चर्चा केली.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी उर्वरित टाटा एअर बसचे (६ पैकी) एक प्रकल्प महाराष्ट्रात यावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. तब्बल अडीच वर्षे उद्धव ठाकरे सत्तेत असूनही टाटा एयरबसशी चर्चा केली नाही. कारण उद्धव व आदित्य ठाकरेंना असा प्रकल्प आहे हेच माहिती नव्हतं. समजा माहिती जरी असलं तरी संबंधित कंपन्यांशी चर्चा कोण करणार? त्यांनी स्वतःला घरात कोंडून घेतले होते. हा प्रकल्प महाराष्ट्रात कसा येऊ शकतो यासाठी चर्चा तरी करण्याची गरज नव्हती का? चर्चा न करता प्रकल्प राज्यात कसे आणतात? यावर महाविकास आघाडीने राज्यातील जनतेला सांगावं.

### सॅफरॉन प्रकल्प

सॅफरॉन कंपनी ही विमानाचे इंजिन बनवणारी कंपनी आहे. ह्या कंपनीला भारतात प्रकल्प सुरू करायचा होता. त्यासंदर्भात देशातील प्रमुख औद्योगिक राज्यं आहेत. त्या राज्यांशी जानेवारी २०१९ मध्ये कंपनीने चर्चा सुरू केली होती. आज मराठी माध्यमांनी आणखी एक प्रकल्प हैदराबाद गेला अशा संदर्भात बातम्या चालवल्या. खरंच हा प्रकल्प हैदराबादमध्ये गेला आहे का? गेला असेल तर केव्हा गेला?

उद्धव ठाकरेंनी जे टाटा एअर बस संदर्भात केलं, तेच या कंपनी संदर्भातही केलं. सॅफरॉन कंपनीचा असा कोणता प्रकल्प आहे हे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना माहिती नव्हतं. १५ एप्रिल २०२१ रोजी तेलंगणा सरकार सोबत सॅफरॉन या विमानाचे इंजिन बनवणाऱ्या कंपनीने अंतिम सामंजस्य करार केला. हैदराबाद येथे प्रकल्पाचे भूमिपूजन केले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच सर्व महत्वाचे प्रकल्प गुजरात, तेलंगाणा, हिमाचल प्रदेशमध्ये गेले आणि या घर कोंबड्याला माहिती त्याची माहितीसुद्धा नव्हती. फॉक्सकॉन राज्यात येणार नाही असे मविआ सरकारचे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी जाहीर केले होते. तरीही ही मंडळी आज या प्रकल्पाबाबत खुशाल खोटे बोलत आहेत. ■



**नाशिक- उपस्थिती-** अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, सरचिटणीस एजाज शेख, रीदा रशीद, सलीम बागवान आदी.



**गंगापूर- उपस्थिती-** अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, आ. प्रशांत बंब आदी.



**शहादा-तळोदा- उपस्थिती-** अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, आ. राजेश पाडवी आदी.




**नागपूर- विदर्भ विभागाच्या क्लस्टर प्रमुख विधानसभा संयोजकांची बैठक-** अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, हज कमिटीचे अध्यक्ष गुड्डू भाई, सरचिटणीस जुनेद भाई आदी.



**प्रदेश प्रवक्त्यांच्या कार्यशाळेत राष्ट्रीय प्रवक्ते खा. सुधांशु त्रिवेदी यांचे मार्गदर्शन– उपस्थिती–** राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ल, आ. अतुल भातखळकर, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक, राष्ट्रीय माध्यम समन्वयक के. के. उपाध्याय, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी.



**चित्रपट कामगार संघटनेच्या संगीता पाटील यांचा पक्ष प्रवेश– उपस्थिती–** ज्येष्ठ नेते डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे. यावेळी रंजना शेलार, प्रिया भिडे, अर्चना साळुंके, कोमल पाटील, निशा पाटेकर, शोभा अहिरे, संगिता बुकाने, रागिणी सिंग, सीमा बाविस्कर, राखी जाधव, प्रसाद पाटील, प्रदीप बागुल, संतोष सिंग, गणेश मोरे, विशाल ताटके, नसीब खान, अकबर अली मन्सूरी, स्वप्नील गिरी, सुनील मोरे आदी.




**मालेगाव– 'आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र' उपस्थिती–** शहरअध्यक्ष व विधानसभा प्रमुख देवाभाऊ पाटील, युवा मोर्चा शहराध्यक्ष श्याम गांगुर्डे, विद्यार्थी विभागाचे महाराष्ट्र सहसंयोजक राज चव्हाण, निलेश सोनवणे, निलेश जाधव, गणेश भालेराव, सोनु दाभाडे, संदिप मोरे, मोहन कांबळे, देवा वाघ, विजय भालेराव आदी.



**नागपूर– युवा मतदार महासंमेलन– उपस्थिती–** ज्येष्ठ नेते कैलास विजयवर्गीय, आ. प्रवीण दटके, भाजपा जिल्हाध्यक्ष जितेंद्र कुकडे, माजी खासदार अजय संचेती, आ.कृष्णा खोपडे, आ.विकास कुंभारे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार मिलिंद माने, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनूप मोरे, स्कायडायवर पद्मश्री शीतल महाजन, युवा मोर्चा शहराध्यक्ष बादल राऊत, विनय चांगदे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस शिवानी दाणी आदी.



**सांगली– 'आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र'– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस वैभव सिंग, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनूप मोरे, राष्ट्रीय मीडिया प्रभारी अमनदीप, प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, प्रदेश उपाध्यक्ष अमृत मारणे, संग्राम बर्गे, प्रदेश उपाध्यक्ष प्रिया पवार, ऐश्वर्या जगताप, विद्यार्थी आघाडीचे रमाकांत कापसे, प्रदेश सचिव रौनक शेट्टी, तेजस गडाळे, सचिन जायभाये, सातारा जिल्हाध्यक्ष चिन्मय कुलकर्णी आदी.



**मालवण– 'आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र'– उपस्थिती–** युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनूप मोरे, प्रदेश सरचिटणीस निखिल चव्हाण, सिंधुदुर्ग प्रभारी स्वप्निल काळे–पाटील, जिल्हाध्यक्ष संदीप मिस्त्री, जिल्हा सरचिटणीस संतोष पुजारी, गणेश तळवणकर, ललित चव्हाण, विजय इंगळे आदी.




**काँग्रेस नेते रवी राजा व उबाठाचे बाबू दरेकर यांचा पक्षप्रवेश– उपस्थिती–** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार आदी.



**वाशीम जिल्ह्यातील शरद पवार गटाच्या नेत्या सई डहाके यांचा पक्षप्रवेश– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश उपाध्यक्ष आ.संजय कुटे, प्रदेश सरचिटणीस आ.विक्रांत पाटील आदी.



**प्रहार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांचा प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश.**



**मनसेचे जळगाव शहर जिल्हा उपाध्यक्ष आशिष सपकाळे यांचा पक्ष प्रवेश– उपस्थिती–** ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आ. राजूमामा भोळे, महानगर जिल्हाध्यक्ष उज्वला बेंडाळे, दीपक सूर्यवंशी, प्रदीप रोटे, सुनील सरोदे, विठ्ठल पाटील, हर्षल आमोदे, सौरभ दांडगे, नरेश मराठे, मोहित मोरे, गौरव पाटील, पवन पाटील, संकेत लाड, विशाल सरोदे, आकाश मोरे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com